cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९४ | मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### फाजील लाड थांबले पाहिजेत

महाराष्ट्रातील साखर पट्ट्यातील शेतकरी आणि कारखानदारांमधील ऊस खरेदी दराचा वाद सुरू झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शेतकरी संघटनेने प्रति टन ३७५१ रुपये देण्याची मागणी लावून धरली असून, तेथील चर्चा ३५०० रुपयांपर्यंत गेली तरी ऊसतोड सुरू झालेली नाही.

# एफआरपी थकित असताना कारखाने कसे सुरु?

## चौदा शेतकरी संघटनांचे हातात चाबूक घेऊन आंदोलन

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**थकित एफआरपी, साखरेची भाववाढ आणि कारखान्यांची काटामारी आदी मुद्दे उपस्थित करत सोमवारी (दि. १०) १४ संघटनांनी कोल्हापूर येथील प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन तीव्र केले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी हातात चाबूक घेतला होता. काही कारखान्यांनी मागील हंगामातील एफआरपीप्रमाणे पैसे शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. त्यांची एफआरपी थकित असताना हे कारखाने कसे सुरु झाले? असा सवाल संघटनांच्या नेत्यांनी प्रादेशिक सहसंचालकांना केला.**



भाजपच्या काळात साखरेचा हमीभाव २१ रुपये झाला. त्यानंतरच्या गेल्या आठ वर्षात पेट्रोल, डिझेलचे भाव वाढले. त्या तुलनेत साखरेचा भाव वाढायला पाहिजे. यासाठी सहसंचालक म्हणून तुम्ही शासनाकडे शिफारस केली आहे का? कारखान्यांच्या वजनकाट्यांची हेराफारी थांबवणार आहे की नाही? असे सवाल यावेळी करण्यात आले. यावर तातडीने कारवाई करावी, अन्यथा आम्ही ठिय्या आंदोलनातून उठणार नाही, असा इशारा विविध संघटनांच्या नेत्यांनी दिला. त्यावर सहसंचालक कार्यालयाकडून खुलासा करण्यात आला. २०२४–२५ हंगामातील काही कारखान्यांनी एफआरपी दिलेली नाही. ८ कारखान्यांकडे ३५ कोटी थकित आहे. या अनुषगांने प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाने, त्यांच्या ‘आरआरसी’ म्हणजेच महसूल थकबाकीप्रमाणे वसुली करावी, असा प्रस्ताव साखर आयुक्त कार्यालयाला दिला होता. यावर याआधी तीन सुनावण्या झाल्या. त्याच्या फायली आदेशासाठी बंद केलेल्या अवस्थेत आहे. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन शासनाने दाखल केले आहे. त्याचबरोबर उच्च न्यायालयात एक रिट पीटीशन महाराष्ट्र राज्य साखर संघाने दाखल केले आहे. दरम्यान, मंत्री समितीने निर्णय घेतला आहे की जो निर्णय न्यायालय देईल, त्याला अधीन राहून आणि कारखान्यांकडून हमीपत्र घेऊन गाळप परवाने द्यावेत, असा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार, आठ कारखान्यांनी हमीपत्र दिले असल्याचे सहसंचालक ▶▶ पान २ वर

# राजधानी दिल्ली स्फोटाने हादरली: १२ ठार

**दिल्ली । वृतसंस्था**

**देशाची राजधानी दिल्लीमध्ये सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी भीषण स्फोट झाला. या स्फोटामध्ये तब्बल १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून, मृताची संख्या वाढण्याची शक्यता आहे. स्फोटात एक डझनपेक्षा जास्त गाड्या जळून खाक झाल्या आहेत. स्फोट एवढा भीषण होता की, मृत व्यक्तींच्या शरीराच्या चिंधड्या उडाल्या.**

दिल्लीतल्या ऐतिहासिक लाल किल्ल्या जवळ साधारण अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या मेट्रो स्टेशनजवळ स्फोट झाला. मेट्रो स्थानकाच्या गेट क्रमांक एक जवळ एका उभ्या असलेल्या कारमध्ये स्फोट झाल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. कारमध्ये दोन स्फोट झाले. परिसरात असलेले एक डझनपेक्षा जास्त वाहनं जळून खाक झाले आहेत. या स्फोटामध्ये आठ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटना घडताच एनआयएची टीम घटनास्थळी दाखल झाली. वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि सुरक्षा यंत्रणांनी तपासकार्य सुरु केलं आहे. दिल्लीमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आलेला असून मुंबईसह देशातील इतर भागांमध्येही हाय अलर्ट देण्यात आला. दरम्यान, ▶▶ पान २ वर



## १०४ तहसीलदारांना ‘कास्ट व्हॅलिडिटी’ नसतानाही पदोन्नती?

**मुंबई । प्रतिनिधी**

‘कास्ट व्हॅलिडिटी’ नसतानाही राज्यातील तब्बल १०४ महसूल अधिकाऱ्यांना तहसीलदार, उपजिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी पदांवर पदोन्नती देण्यात आल्याचे उघड झाले आहे .त्यापैकी केवळ १२ अधिकारीच अधिसंख्य पदांवर असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष म्हणजे, अनुसूचित जमातीतील अधिकाऱ्यांना मात्र पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. हा धक्कादायक प्रकार माहिती अधिकारातून समोर आला आहे.

सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाळकृष्ण मते हे गेल्या २४ वर्षापासून लढा देत आहेत. ते सन २००१ पासून तहसीलदार, २००४–२००५ पासून उपजिल्हाधिकारी आणि २०१५ पासून अपर जिल्हाधिकारी पदासाठी पात्रता प्राप्त असूनही त्यांना पदोन्नती मिळालेली नाही. याउलट त्यांच्यापेक्षा कनिष्ठ अधिकाऱ्यांना जात प्रमाणपत्र अवैध ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### दिल्लीचे जवाहरलाल नेहरू स्टेडियम तोडले जाणार

नवी दिल्ली: राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील क्रीडा क्षेत्रासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेण्यात आला आहे. सध्याचे जवाहरलाल नेहरू स्टेडियम पाडून, त्याच्या जागी १०२ एकर जागेवर एक अत्याधुनिक स्पोर्ट्स सिटी उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या उच्चस्तरीय सूत्रांनी ही माहिती दिली आहे. या भव्य प्रकल्पासाठी क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी कतार आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांमध्ये यशस्वी ठरलेल्या आधुनिक क्रीडा संकुलांच्या मॉडेलचा सखोल अभ्यास करत आहेत. दिल्लीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा पायाभूत सुविधा तयार करणे आणि राजधानीला जागतिक स्तरावरील क्रीडा केंद्र म्हणून स्थापित करणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

### औषध कंपन्यांना ३१ डिसेंबरपर्यंत अल्टिमेटम

नवी दिल्ली : विषारी कफ सिरपमुळे अलीकडेच मोठ्या प्रमाणात बालकांचे मृत्यू झाले होते. या प्रकारानंतर देशातील औषध उत्पादक कंपन्यांना जागतिक उत्पादन मानके पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कंपन्यांनी ही प्रक्रिया जानेवारीपर्यंत पूर्ण करावी. त्यापुढे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही, असे भारताच्या औषध नियामकांनी स्पष्ट केले आहे. विषारी कफ सिरपमुळे सप्टेंबरमध्ये २४ बालके दगावली. यामुळे हादरून गेलेल्या यंत्रणांनी सर्व उत्पादक कंपन्यांची झाडाझडती घेतली. काही कंपन्यांच्या संचालकांवर कारवाई करण्यात आली.

### उशीर झाल्याने राहुल गांधींनी दिली स्वत:ला शिक्षा

पंचमढी: मध्य प्रदेशातील पंचमढी येथे सुरू असलेल्या काँग्रेसच्या प्रशिक्षण शिबिरात पक्षनेते राहुल गांधी दोन मिनिट उशिरा पोहोचले. पण याची त्यांना एक वेगळीच शिक्षा मिळाली. ती म्हणजे दहा पुशअप्स मारण्याची. राहुल गांधींनीही ही शिक्षा कोणतीही हरकत न घेता स्वीकारली आणि सर्वांसमोर ती पूर्ण केली. काँग्रेसच्या या प्रशिक्षण शिबिरात संघटन सृजन अभियान (एसएसए) अंतर्गत सर्व सहभागींसाठी एक नियम ठरवण्यात आला होता. जो वेळेत येणार नाही, त्याला शिक्षा म्हणून १० पुशअप्स मारावे लागतील. राहुल गांधी उशिरा आल्यावर त्यांनी स्वत: पुढाकार घेत हा नियम पाळला आणि १० पुशअप्स पूर्ण केले.

### भाडेकरू मालक होऊ शकत नाही–सर्वोच्च न्यायालय

दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाने प्रॉपर्टी मालकाच्या हक्कांचे संरक्षण करणारा एक महत्वाचा निर्णय दिला. हा निर्णय देतेवेळी सर्वोच्च न्यायालयाने एक मोठे वक्तव्य देखील केले. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, भाड्याच्या घरात भाडेकरू ५ वर्षे असो वा पन्नास वर्षे कितीही वर्षे राहिला तरी तो त्या प्रॉपर्टीचा मालक होऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने हे वक्तव्य ज्योती शर्मा विरूद्ध विष्णू गोयल या याचिकेच्या सुनावणीदरम्यान केले. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वर्षांपासून भाडेकरू – घरमालक यांच्यातील मालकी हक्कासंबंधीच्या वादाबाबतचा गोंधळ संपुष्टात आणला आहे. यामुळे मूळ घर मालकांना दिलासा मिळाला आहे.

# पुत्र पार्थच्या महाभारतामुळे अजितदादा अडचणीत

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ यांच्या जमीन खरेदीमुळे महायुती सरकारवर मोठी नामुष्की ओढवली. पुणे शहरातील मोक्याच्या जागेवरील तब्बल ४० एकरची सरकारी जमीन पार्थ पवार यांच्या कंपनीने खरेदी केली. १८०० कोटी रुपयांची जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी केली. विशेष म्हणजे जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीत पार्थ यांची ९९ टक्के भागिदारी असतानाही या सगळ्या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये पार्थ यांचे नाव नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होत असताना पार्थ यांच्यामुळे महाभारत घडलं असून राष्ट्रवादी काँग्रेस बॅकफूटवर गेली आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सगळ्या प्रकरणावर पडदा टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला. जमीन सरकारी मालकीची असल्याची कल्पना पार्थ पवारांना नव्हती. हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे, असे म्हणत अजित पवारांनी विषय संपवण्याचा प्रयत्न केला. पण हे प्रकरण गंभीर असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खर्गे यांच्या अध्यक्षतेखालील समिती या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. विकास खर्गे यांच्या अध्यक्षतेखालील समिती महिनाभरात किंवा त्यापेक्षा ▶▶ पान २ वर

# रुपाली ठोंबरेसह मिटकरींना प्रवक्ते पदावरून हटवले



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर आणि त्याच पक्षातील नेत्या रुपाली ठोंबरे–पाटील यांच्यात अनेकदा वाद होताना दिसतो. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी हे अनेकदा वादग्रस्त वक्तव्य करताना दिसतात. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नव्या प्रवक्त्यांची नियुक्ती करताना ▶▶ पान २ वर

### एका रुपालीचे प्रमोशन तर दुसरीचे डिमोशन

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने प्रवक्त्यांची यादी जाहीर केली असून, आतापर्यंत प्रवक्तेपद असलेल्या रुपाली ठोंबरेंकडून हे पद काढून घेण्यात आले आहे. राष्ट्रवादीने आपल्या प्रवक्त्यांची यादी जाहीर केली आहे. १७ प्रवक्ते कोण असतील हे पक्षाने पत्रक काढून जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असण्याबरोबरच राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष असलेल्या रुपाली चाकणकरांचे या यादीत नाव असून, त्यांना या माध्यमातून पुन्हा बढतीच मिळाल्याची चर्चा आहे. या यादीमध्ये रुपाली ठोंबरेंचे नाव नाही.

# वैद्यनाथ कारखाना देताना मला प्रचंड वेदना !

## स्व.मुंडेंच्या आठवणींना उजाळा देत पंकजा मुंडे गहिवरल्या

**परळी । प्रतिनिधी**

स्व.गोपीनाथ मुंडे यांनी स्थापन केलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना अखेर ओंकार साखर कारखान्याने खरेदी केला आहे. या कारखान्याच्या नव्या गाळप हंगामाचा शुभारंभ सोमवारी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी स्व.गोपीनाथ मुंडे यांनी उभारलेला हा कारखाना ▶▶ पान २ वर




# सहा मोठ्या बँका लवकरच होणार बंद!

**दिल्ली । वृतसंस्था**

देशातील बँकिंग क्षेत्रात मोठा बदल होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. केंद्र सरकार आता लहान सरकारी बँकांचे एकत्रीकरण (मर्जर) करण्याच्या तयारीत असून, या निर्णयामुळे देशात केवळ काही मोठ्या सार्वजनिक बँकाच शिल्लक राहू शकतात.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्वत: यासंदर्भात सांगितले की, भारताला जागतिक दर्जाची बँकिंग सिस्टीम हवी आहे. भारतीय बँकांना जगातील टॉप बँकांच्या यादीत ▶▶ पान २ वर

# भारताविरोधात बायो केमिकल शस्त्राचा वापर



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

गुजरात एटीएसने इसिसशी निगडित एक मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उधळून लावला आहे. ज्यात रिसिन नावाचे रासायनिक विषाचा वापर करण्याचे षडयंत्र होते. हे विष एरंडीच्या बियांपासून तयार केलेले असते. जे घराघरात सहजपणे मिळते. परंतु हे धोकादायक आहे. याच्या अगदी थोड्या प्रमाणातही एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो. याच रिसिनचा वापर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ▶▶ पान २ वर

### रिसिन कसे बनवले जाते?

एरंडीच्या बियाण्यांमधून तेल काढल्यानंतर उरणारा कचरा, ज्याला एरंडेल केक’’ म्हणतात, हा रिसिनचा मुख्य स्रोत आहे. दरवर्षी जगभरात २० लाख टनांहून अधिक एरंडेल बियाण्यांवर प्रक्रिया केली जाते. या कचऱ्यापैकी ५% रिसिन असते. बियाणे कुस्करले जातात आणि गरम पाणी किंवा रसायनांचा वापर करून तेल वेगळे केले जाते. उर्वरित लगदा रिसिनने भरलेला असतो. रिसिन घरी बनवणे देखील सोपे आहे मात्र ही प्रक्रिया धोकादायक आहे. विषाचा एक छोटासा भाग देखील हवेत जाऊ शकतो आणि आजार निर्माण करू शकतो.

### रिसिन म्हणजे काय?

रिसिन हे एरंडेल वनस्पतीच्या (रिसिनस कम्युनिस) बियांमध्ये आढळणारे एक प्रथिन आहे. ही वनस्पती जगभरात प्रामुख्याने तेल काढण्यासाठी लागवड केली जाते. एरंडेल तेल औषधे, साबण आणि यंत्रसामग्रीमध्ये वापरले जाते. मात्र या बियांमध्ये रिसिन नावाचे विष असते, जे इतके शक्तिशाली आहे की ते जैविक शस्त्र मानले जाते. अमेरिका आणि रशिया सारख्या देशांनी एकेकाळी ते शस्त्र म्हणून वापरण्याचा विचार केला होता.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३४.०० क्विंटल | २,३७१ | २,९८६ | २,६७७ |
| ज्वारी/हायब्रिड :६५.०० क्विंटल | १,९०१ | ३,४८० | २,९४७ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ३,९०० | ५,०७० | ४,६५७ |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,३०० | २,८०० | २,६०६ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,२०० | ६,२०० | ६,२०० |
| सोयाबीन:६६०.०० क्विंटल | ४,३०० | ५,१०० | ४,५१५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |




cmyk

अग्रलेख

# फाजील लाड थांबले पाहिजेत

महाराष्ट्रातील साखर पट्ट्यातील शेतकरी आणि कारखानदारांमधील ऊस खरेदी दराचा वाद सुरू झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शेतकरी संघटनेने प्रति टन ३७५१ रुपये देण्याची मागणी लावून धरली असून, तेथील चर्चा ३५०० रुपयांपर्यंत गेली तरी ऊसतोड सुरू झालेली नाही. शेतकरी तोडणीस विरोध करत असून, सर्व संघटनांनी एकत्र येऊन गेल्या वर्षीच्या गळीत हंगामाचे अधिकचे २०० रुपये आणि एकूण ३७५१ रुपये मिळाल्यानंतरच तोड करावी, असा आग्रह धरला आहे. यामुळे कारखानदारांची कोंडी झाली आहे. सांगली जिल्ह्यात राजू शेट्टी यांच्या मागणीप्रमाणे कोल्हापूरच्या धर्तीवर दर जाहीर करण्याची मागणी करण्यात आली असून, जिल्हाधिकाऱ्यांनी पाच दिवसांत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी, राज्याच्या प्रमुख ऊस पट्ट्यात कारखानदार अडचणीत सापडले आहेत.

हा विषय केवळ स्थानिक वादाचा नाही, तर ती राष्ट्रीय साखर उद्योगाच्या भविष्याशी निगडित आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अवस्थेचा विचार करता, हा संघर्ष केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक न्यायाचा आहे. महाराष्ट्रातील ऊस खरेदी दराचा हा वाद दरवर्षी पेटतो, पण यंदा तो अधिक तीव्र आहे. सरकारने कधीतरी शेतकऱ्यांच्या बाजूने यात उतरले पाहिजे ही शेतकऱ्यांची रास्त भावना आहे. पण आपल्याकडे होणाऱ्या गर्दीला सरकार भूलते. मुठभरांची गर्दी महत्त्वाची की जनता याचा विचार यंदा व्हायला हवा होता. केंद्र सरकारने २०२४-२५ हंगामासाठी उसाचा फेअर अँड रिम्युनरेटिव्ह प्राईस (एफआरपी) ३,४०० रुपये प्रति टन ठरवला आहे. मात्र, शेतकरी संघटनांच्या मते, हा दर उत्पादन खर्चाच्यापेक्षा कमी आहे. वीज बिल, पाणीपट्टी, मजुरी, खते, डिझेल यांचे वाढते दर विचारात घेता, शेतकऱ्यांना किमान ३,७५० रुपये मिळणे आवश्यक आहे. कोल्हापूर-सांगलीसारख्या जिल्ह्यांत साखरेचे सरासरी भाव ३,८०० रुपये प्रति क्विंटल मिळत असल्याने कारखान्यांकडे नफा शिल्लक राहतो, तरी तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. अनेकदा अशाच वादामुळे ऊस वाहतूक रोखली जाते. यंदा कर्नाटक सीमेवरीलही तणाव वाढला असून, बेळगाव जिल्ह्यातही ३,५०० रुपयांच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी टोल नाक्यांवर दगडफेक केली आहे. हे आंदोलन फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, कर्नाटकातील २६ कारखान्यांचे गाळपही ठप्प झाले आहे. राज्यातील आणि देशातील साखर परिस्थिती सध्या जटिल आहे. २०२४-२५ हंगामात भारताचे साखर उत्पादन ३४ दशलक्ष टनांपर्यंत खाली आले आहे, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत १५.५ टक्क्यांनी कमी आहे. महाराष्ट्रात २१.५ टक्के आणि कर्नाटकात १८.१ टक्के उत्पादनात घसरण झाली असून, याचे कारण गेल्या वर्षी दुष्काळ आणि यंदाच्या अतिवृष्टीत आहे. उत्तर प्रदेशात रेड रॉट रोगामुळे उत्पादन प्रभावित झाले आहे. साखरेचे भाव कोल्हापूरात ३३,६७५ रुपये प्रति टनांपर्यंत घसरले असून, हा १८ महिन्यांचा नीचांक आहे. मात्र, २०२५-२६ हंगामासाठी चांगले दिवस दिसत आहेत. चांगल्या पावसामुळे ऊस लागवड क्षेत्र ९ टक्क्यांनी वाढले असून, उत्पादन ३४.९ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात एकट्याचे उत्पादन १३.२६ दशलक्ष टन होईल. पेट्रोलमध्ये इथेनॉल ब्लेंडिंग कार्यक्रमामुळे साखरेच्या ३.५ ते ४ दशलक्ष टनांची विभागणी होईल, ज्यामुळे साखर निर्यातीला २ दशलक्ष टन कोटा मिळण्याची अपेक्षा आहे. इथेनॉलचे भाव वाढवण्याची मागणी कारखानदार करत आहेत. धान्य-आधारित इथेनॉलमुळे ऊस-आधारित इथेनॉलचे प्रमाण कमी होत आहे. ही परिस्थिती शेतकऱ्यांच्या मागणीला बळ देते, कारण उत्पादन वाढले तरी भाव स्थिर राहिले तर शेतकरी फायद्यात येतील. ऊस खरेदीचा हा वाद भविष्यात गंभीर परिणामकारक ठरेल. एकीकडे, आंदोलनामुळे गळीत हंगाम उशिराने सुरू होऊ शकतो, ज्यामुळे तोडणी-वाहतूक खर्च वाढेल आणि कारखान्यांचे उत्पादन कमी होईल. सांगली-कोल्हापूरमध्ये पाच दिवसांची मुदत संपली तरी तोडगा न निघाल्यास हिंसक वळण घेण्याची शक्यता आहे. तोडणी वाहतूक दरातील मनमानी विरोधात देखील संघटना उच्च न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत. शेतकऱ्यांच्या एकजुटीमुळे आणि दबाव वाढवण्यामुळे दर वाढण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षीही अशा आंदोलनांमुळे काही कारखान्यांनी ३,५०० रुपयांपर्यंत दर जाहीर केले होते. राष्ट्रीय स्तरावर, एफआरपी वाढवण्याची मागणी जोर धरली आहे. २०२५-२६ साठी एफआरपी ३५५ रुपये प्रति क्विंटल (३,५५० प्रति टन) करण्यात आली असली तरी, राज्य पातळीवर अतिरिक्त दराची गरज आहे. निर्यात कोटा मिळाल्यास साखर भाव वाढतील, ज्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल. मात्र, जलसंकट आणि कमी रिकव्हरी रेट (९.५-१० टक्के) ही आव्हाने काही भागात कायम आहेत. भविष्यात इथेनॉल वापर आणि उत्पादन वाढवून कारखान्यांना आधार मिळेल, पण त्यासाठी शेतकऱ्यांना न्याय भाव मिळणे आवश्यक आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था साखर कारखानदारीवर अवलंबून आहे. ऊस शेतीमुळे लाखो कुटुंबांना रोजगार मिळतो, पण दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे उत्पादन खर्च ३,००० रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. गेल्या चार-पाच वर्षांत शेतकऱ्यांना ३,०००-३,१०० रुपयांपर्यंतच भाव मिळाले, ज्यामुळे कर्जबाजारीपण वाढले. स्वाभिमानी, बळीराजा, शेतकरी संघटना, आंदोलन अंकुश, शेतकरी सेना, जय शिवराय यांसारख्या संघटनांनी एकत्र येऊन लढा दिला असला तरी, बळीराजा शेतकऱ्यांना सरकारनेही आधार देण्याची गरज आहे, कारण ते कारखान्यांच्या नफ्यातील हिस्सा मागत आहेत. राजू शेट्टींसारखे नेते राजकीय पातळीवर मध्यस्थी करत असले तरी, शासनाने एफआरपी व्यतिरिक्त हस्तक्षेपाची तयारी ठेवली पाहिजे. सरकार कारखानदारांचे तेवढे ऐकते हा शेतकऱ्यांमध्ये असलेला सरकारबाबतचा अविश्वास या सरकारच्या काळात नष्ट होणे गरजेचे होते. मात्र कारखानदारांची गर्दी होईल तसे सरकारला आपल्या मूळच्या भूमिकेचे विस्मरण होऊ लागले आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

# 'एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व किशोर नाना हंबर्डे'

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात स्वतःच्या जगण्याचे काय तत्व आहे यावरूनच त्याचे समाजातील व्यक्तिमत्त्व ठरते.प्रत्येकालाच स्वतःचे एक आपले वेगळे व्यक्तिमत्व असते ते आपल्या वयाशी किंवा शिक्षणाशी किती सुसंगत आहे यावरून त्याचे महत्व ठरते.प्रत्येक स्वतंत्र असलेल्या व्यक्तिमत्वाचा सभोलताच्या वातावरणावर,समाजावर, कुटुंबावर,मित्रांवर किंवा त्याच्या एकूणच कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्वच घटकांवर वेगवेगळा प्रभाव पडतो, आपल्या असामान्य व्यक्तीमत्वाने समाजात स्वतःचे एक आगळे वेगळे स्थान निर्माण करणारे खूप कमी लोक पहायला मिळतात असेच आष्टी तालुक्यातील एक अभ्यासू व व्यासंगी व्यक्तिमत्व म्हणजे आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व आमचे प्रेरणास्थान किशोर नाना हंबर्डे हे आहेत.एखाद्या व्यक्तीतील चांगले गुण हेरून ते आत्मसात करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्या व्यक्तीच्या एकूणच व्यक्तीमत्वांपासून प्रेरणा घेणे,किशोर नाना व्यक्ती म्हणून तर सर्वगुणसंपन्न आहेत त्यांची स्वतःची एक विचारधारा आहे त्याच्याशी ती कुठल्याही परिस्थितीत तडजोड करत नाहीत ते ज्या कोणत्या क्षेत्रात काम करतात त्यासाठी त्यांचे ध्येय स्पष्ट ठरलेले असते म्हणूनच प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्याचे त्यांचे ते एक प्रमुख कारण आहे.प्रत्येक ठिकाणी काम करत असताना त्यासंबंधी सकारात्मक भूमिका ठेवूनच ते वाटचाल करतात. जगाच्या प्रवाहा बरोबर वाहत राहून कायम स्वकर्तुत्वाला गती देण्याचे काम नाना करतात,अखंड क्रियाशील राहून कामात स्वतःला वाहून घेणे त्यांना आवडते,थांबणे हे त्यांच्या मूळ स्वभावातच नाही त्याचे कारण आपली नैसर्गिक रचना ही आपल्याला कायम गतिमान राहण्याचेच शिकवते.या पृथ्वीतलावर असा एक ही मनुष्य नाही की ज्याला काहीच समस्या नाहीत, मनुष्य पद, सत्ता,संपत्तीने कितीही मोठा असला तरी तो सर्व समस्यामुक्त असेल असे कधी होत नाही किंवा तो सर्वज्ञानी गुणसंपन्न असला तरी त्याच्या जीवन मार्गात दुःख,अडचणी येणार नाहीत असे नाही,प्रत्येकाला या जीवन



प्रवासात संकटांचा सामना करून पुढे जावेच लागते फक्त त्यातील काही जण संकटावर यशस्वी मात करतात तर काही कोलमडून पडतात.नानांना वैयक्तीक व सामाजिक जीवनात खूप अडचणी आल्या,आजही येतात परंतु या संकटाला न घाबरता न डगमगता ते त्याला सामोरे जातात,समस्येचा अभ्यास करतात त्याचे मूळ कारण शोधून काढतात, त्याच्या होणाऱ्या साधक बाधक परिणामांचा विचार करून त्यावर मार्ग काढतात,प्रत्येक प्रतिकूल प्रसंगात खंबीरपणे उभे राहून आपल्या दैनंदिन जीवन शैलीवर त्याचा कसलाही परिणाम ते होऊ देत नाहीत ते नेहमी भावनेपेक्षा बुद्धीच्या कसोटीवर काम करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या वागण्या बोलण्यातून कधीच निराशा, संकट,दुःख,पच्यातापा, चिंता व्यक्त होत नाहीत,नाना भूतकाळात फारसे कधी रमत नाहीत उज्वल भविष्काळासाठी उड्डाण घेण्याचा प्रयत्न मात्र त्यांचा कायम असतो त्यासाठी त्यांचे पाय मात्र वर्तमानकाळात नेहमीच जमीनीवर असलेले पाहायला मिळतात.

साहित्य, कला,शिक्षण, संस्कृती, विज्ञान तंत्रज्ञान, शेती, खेळ, उद्योग, राजकारण अशा विविध क्षेत्राची त्यांना आवड आहे किंबहुना बऱ्या पैकी त्याचे ज्ञान त्यांना अवगत असल्यामुळे त्याचा वापर ते कौशल्याने करतात,ते अध्यक्ष असलेली आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था पुढच्या वर्षी ५० व्या सुवर्ण मोहत्सवी वर्षात प्रवेश करत आहे १९७२ साली दुष्काळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सोय व्हावी म्हणून हे शिक्षण संस्थेचे रोपटे लावले गेले कालांतराने त्याचा पसारा वाढून वृक्ष तयार झाला परंतु या संस्था रुपी वृक्षाला खरी बहार आली ती किशोर नाना यांनी संस्था कारभार हाती घेतल्या नंतरच असे म्हणले तरी ते आज वावगं ठरणार नाही,आज संस्थेचे कला,वाणिज्य,विज्ञान पदवी ते पदव्युत्तर महाविद्यालय, विविध व्यावसायिक कोर्सेस,पिंपळेश्वर इंग्रजी माध्यमाची शाळा आज दिमाखात चालू आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व नानांचे वडील कै. ऍड.बन्सीधरराव हंबर्डे हे आष्टी न्यायालयात एक नामांकित वकील होते त्यांच्या स्मरणार्थ नानांनी यावर्षी विशेष प्रयत्न करून ऍड.बी.डी.हंबर्डे विधी महाविद्यालयाची स्थापना केली त्याद्वारे आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी कुठेही बाहेर जिल्ह्यात जाण्याची गरज नाही.सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांना ज्ञान मिळवताना दर्जेदार पुस्तके वाचण्यासाठी सर्व सोयींनी युक्त असे आधुनिक ग्रंथालय महाविद्यालय परिसरात यावर्षी सुरू झाले आहे,विद्यार्थ्यांना व्यायामासाठी जीम व दोन मोठे क्रीडांगण महाविद्यालयात तयार केले आहेत. अवर्षणग्रस्त असलेल्या आष्टी तालुक्यात कायम पाण्याची टंचाई असते महाविद्यालय परिसरात रोज वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची कायमची अडचण सोडवण्यासाठी महाविद्यालयात शेततळे बांधण्याचा अभिनव प्रयोग नानांनी केला आहे रेन हार्वेस्टिंग द्वारे लाखो लिटर पाण्याची साठवण त्यात दरवर्षी होत असते व त्यामुळे दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची सोय तिथेच होत आहे,महाराष्ट्रातील एखाद्या शिक्षण संस्थेने शेततळे बांधण्याचा प्रयोग हा कदाचित एकमेवाद्वितीय असावा.नाना स्वतः सिव्हील इंजिनिअर आहेत एकेकाळचे बीड जिल्ह्यातील नावाजलेले शासकीय गुत्तेदार होते,माजी आ.दरेकर नाना,आ.धस आण्णा व आ.आजबे काका यांच्या बरोबर नेहमीच त्यांनी काम केलेले आहे,आज त्यांचे आष्टी येथे विविध व्यवसाय सुरू आहेत,आधुनिक तंत्रज्ञान वापरून ते शेतीत नवनवीन प्रयोग करत असतात,नानांनी बांधलेल्या नवीन घराच्या गृहप्रवेश प्रसंगी तर देशाचे नेते शरद पवार साहेब यांची उपस्थिती लाभली हा क्षण नानांना आयुष्यात सर्वात मोठा आनंद देणारा होता. राजकारणात,समाजकारणात नेहमीच सक्रिय राहून प्रत्येकाच्या वैयक्तिक सुख दुःखात ते हजर असतात,संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करतात त्यांना चांगले मार्गदर्शन करतात,कोणत्याही वयोगटात,कोणत्याही जाती धर्मात किंवा कुठल्याही गावात त्यांनी माणसं जोडली त्यांनी माणसांवर, माणुसकीवर प्रेम केले म्हणूनच कुठेही त्यांच्या बरोबर माणसं दिसतात,त्यांच्यावरील प्रेम व्यक्त करतात.म्हणूनच एखाद्या ठिकाणच्या सामाजिक कार्यक्रमातील त्यांच्या अनुपस्थितीची दखल समाजाकडून घेतली जाते, कोणी कुठे चुकले तर त्याला हक्काने रागावतात व त्याने केलेल्या चांगल्या कामाचे कौतुकही तेवढयाच मोठ्या मनाने चारचौघांत करतात ही त्यांची जमेची बाजू आम्ही सगळ्यांनी अनुभवलेली आहे.हाती घेतलेल्या प्रत्येक कामावर बारीक लक्ष ठेवून त्या कामासाठी कितीही कष्ट झाले तरी ते पूर्णत्वास नेणं हे त्यांचे खास वैशिष्ठ म्हणता येईल.११ नोव्हेंबर ला नानांचा जन्मदिवस असतो तो दरवर्षी महाविद्यालयात रक्तदान शिबिर,आरोग्य तपासणी,वृक्षारोपण, रुग्णांना फळ वाटप आदी सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो,नानांचे विविध गुणसंपन्न असलेले अजातशत्रू व्यक्तिमत्वच त्यांच्या सामाजिक प्रभावाचे एक प्रमुख कारण ठरले आहे, माझ्या वैयक्तिक जीवनातील मार्गदर्शक असणाऱ्या किशोर नाना हंबर्डे यांना जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा व त्यांना दीर्घायुष्य लाभो ही भगवान विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना...!!

**प्रा.महेश कुंडलीकराव चौरे, आष्टी,मो.९४२३४७१३२४**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जालना येथील जाहीर

## सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- आ. खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

**येत्या १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्यनेते ना. एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत मामा चौक, जालना येथे कार्यकर्ते मेळावा व भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे.**

सभेच्या पूर्वतयारीसंदर्भात भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात जिल्ह्यातील शिवसेना, युवासेना व संलग्न संघटनांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार खोतकर म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या व आगामी विकासकामांची माहिती या सभेत दिली जाणार आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या




पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहावे. बैठकीत घनसावंगीचे आमदार हिकमतदादा उढाण यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, एकनाथ शिंदे यांची सभा ही पक्षासाठी ऊर्जा देणारी ठरेल. आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला प्रचंड यश मिळवून देण्यासाठी सर्वांनी संघटित प्रयत्न करावेत. या बैठकीस आमदार हिकमतदादा उढाण,युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर,जिल्हा संपर्क नेते पंडितराव भुतेकर,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए.जे. पाटील बोराडे, संपर्कप्रमुख सुनील किनगावकर, लाला तांबोळी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, सविता केंवडे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, ॲड. भास्कर मगरे,जावेदभाई, भाऊसाहेब पाऊलबुदे, गणेशराव राऊत, भगवान अंभोरे आदींसह उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विभागप्रमुख, आजी-माजी सदस्य, नगरसेवक व मोठ्या संख्येने शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते. सभेच्या यशासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने तयारी करत असून, मामा चौक परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. कार्यकर्त्यांमध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीबाबत विशेष उत्सुकता दिसून येत आहे.

# पान १ वरून...



## एफआरपी थकित असताना

कार्यालयाकडून सांगण्यात आले. एमएमपीच्या कायद्यात ऊस कारखान्याला गेल्यानंतर जर पंधरा दिवसात त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली नाही तर वार्षिक पंधरा टक्के व्याजासह ऊस बिल देण्याचा कायदा आहे. तसेच कारखान्याच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा कायदा होता. एफआरपीच्या कायद्यातून त्यांनी फौजदारी गुन्ह्याची अट काढून टाकली. जर २५ किमीच्या आत दुसरा कारखाना काढता येत नसेल तर त्या २५ किमीच्या परिघातील शेतकऱ्यांच्याकडून तोडणी वाहतूक समप्रमाणात आकारावी अशी आमची मागणी असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. दरम्यान, शेतकरी संघटनांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा पाठपुरावा करु, असे आश्वासन साखर सहसंचालक कार्यालयाकडून दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून हे आंदोलन सुरु होते. खरी लूट वजनातून होत असून, संगणक आणि प्रिंटरच्या माध्यमातून वजन चोरी केली जाते. त्याला आळा बसावा या प्रमुख मागण्यांसह संघटनांनी ठिय्या आंदोलन सुरु आहे.

---------------

## १०४ तहसीलदारांना 'कास्ट

ठरले असतानाही महसूल मंत्रालयाने पदोन्नती दिली आहे. याबाबत त्यांनी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे ३० सप्टेंबर २०२२ रोजी तक्रार दाखल केली आहे. मात्र, आयोगाने आजतागायत कोणतीही दखल घेतलेली नाही. मते यांनी महसूल मंत्रालयाला २००१ पासून आजपर्यंत अनेक वेळा अर्ज, प्रस्ताव आणि स्मरणपत्रे दिली आहेत. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने ३० मे २०१९ रोजी नायब तहसीलदार पदाचा मानीव दिनांक १७ मे १९९९ मंजूर केला. पुढील पदोन्नतीचा प्रस्ताव अपर सचिव महसूल व वनविभाग यांनी तीन वर्षांहून अधिक काळ दडपून ठेवला आहे. दिशाभूल करणारा अहवाल तयार करून त्यांचा अर्ज २० फेब्रुवारी २०२३ रोजी निकाली काढण्यात आला. अ. बा. कोळी (लिपिक), जी.डी. लोखंडे (तहसीलदार), एन.एल. कुंभारे (तहसीलदार), पी.डी. सूर्यवंशी (तहसीलदार) यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले असतानाही या सर्वांना १९९४ ते १९९९ दरम्यान तहसीलदार आणि उपजिल्हाधिकारी पदांवर पदोन्नती देण्यात आली, असे मते यांनी महसूल विभागाला केलेल्या तक्रारीत स्पष्ट नमूद केले आहे.

------------

## राजधानी दिल्ली स्फोटाने

दिल्लीतील स्फोटानंतर मुंबई पोलीस अलर्ट मोडवर आलेले आहेत. महत्वाच्या ठिकाणांवर मुंबई पोलिसाची करडी नजर असून खबरदारी घ्यायला सुरुवात केली आहे. दिल्लीतला स्फोट इतका भीषण होता की, मृत व्यक्तींचे अवयव इतरत्र उडून पडले. या घटनेत बसदेखील जळाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. रिक्षामध्ये बसलेला एक जण उडून दूरवर पडला. त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरून गेला आहे.

------------

## रुपाली ठोंबरेसह मिटकरींना

रुपाली ठोंबरे-पाटील आणि अमोल मिटकरी यांची हकालपट्टी केली असून सूरज चव्हाण यांना मात्र अभय दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत पत्ते भिरवकल्यानंतर छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली. या घटनेचे तीव्र पडसाद राज्यभरात उमटल्यानंतर युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदावरून पायउतार करण्यात आले होते. मात्र, आता त्यांना पक्षाकडून अभय देण्यात आले आहे. फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्याप्रकरणी रुपाली चाकणकर यांनी केलेल्या वक्तव्यावरून रुपाली ठोंबरे-पाटील यांनी त्यांना लक्ष्य केले होते. त्यामुळे पक्षाकडून रुपाली ठोंबरे-पाटील यांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर रुपाली ठोंबरे-पाटील यांनी अजित पवार यांची भेट घेतली होती. मात्र या भेटीला काही तास उलटत नाही तोच रुपाली ठोंबरे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्तेपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. तर दुसरीकडे अमोल मिटकरी यांच्या वक्तव्यांमुळे महायुतीमध्ये सातत्याने तणाव निर्माण होताना दिसत आहे. त्यामुळे अमोल मिटकरी यांचीही उचलबांगडी करण्यात आली आहे.

**नव्या प्रवक्त्यांची यादी**

अनिल पाटील, रुपाली चाकणकर, ब्रिजमोहन श्रीवास्तव, चेतन तुपे, आनंद परांजपे, अविनाश आदिक, सना मलिक, राजलक्ष्मी भोसले, सुरज चव्हाण, हेमलता पाटील, प्रतिभा शिंदे, विकास पासलकर, राजीव साबळे, प्रशांत पवार श्याम सनेर, सायली दळवी, शशिकांत तरंगे.

------------

## पुत्र पार्थच्या महाभारतामुळे

अधिक कालावधीनंतर तपास अहवाल मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करतील. या प्रकरणी गेल्या आठवड्यात गुरुवारी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली. हे प्रकरण गंभीर असून त्यामुळे तुम्ही किंवा तुमचा मुलगा अडचणीत येऊ शकता, असे फडणवीस यांनी अजित पवारांना सांगितल्याची सुत्रांची माहिती आहे. या प्रकरणी चौकशी गरजेची आहे. सरकारने यामध्ये कारवाई न केल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी जनतेत चुकीचा संदेश जाईल, असे फडणवीसांनी अजित पवारांना सांगितल्याची माहिती आहे. या प्रकरणात चौकशीचे आदेश न दिल्यास सरकार कथित घोटाळ्यात सहभागी असलेल्यांना वाचवत असल्याचे म्हणत कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करेल, असं फडणवीसांनी अजित पवारांना सांगितले. महिनाभर किंवा त्यापेक्षा अधिक काळ चालू राहणाऱ्या चौकशीमुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची अडचण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होत असताना पार्थ यांनी महाभारत घडवल्याने अजित पवारांची मोठी गोची झाली आहे. ज्या कालावधीत चौकशी सुरु असेल, त्याच दिवसांमध्ये जागा वाटपांच्या चर्चा होतील. फडणवीस यांनी महिन्याभराचा टाईम बॉम्ब लावल्याने भाजपमध्ये आनंदीआनंद आहे. चौकशी लागल्यामुळे अजित पवारांची राष्ट्रवादी निवडणुकीत बॅकफूटवर जाईल, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांना वाटते. या चौकशीचा फायदा भाजपला निवडणुकीत होईल.

----------

## सहा मोठ्या बँका

आणण्यासाठी त्यांना अधिक मोठे आणि सक्षम बनवण्याची गरज आहे. त्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यात सध्या चर्चा सुरू आहे. सध्या भारतात एकूण १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँका आहेत. मात्र सरकार ही संख्या कमी करून फक्त चार करण्याचा विचार करत आहे. या चार बँका म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया, केनरा बँक, पंजाब नॅशनल बँक आणि बँक ऑफ बडोदा. माहितीनुसार, या चार बँकांव्यतिरिक्त इतर सर्व लहान सरकारी बँकांचे विलीनीकरण या मोठ्या बँकांमध्ये केले जाऊ शकते. सध्या कोणत्या बँकेचे विलीनीकरण कोणत्या मोठ्या बँकेत होणार, हे स्पष्ट झालेले नाही. मात्र संकेत असे आहेत की, युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँक यांना एकत्र करून देशातील दुसरी सर्वात मोठी सार्वजनिक बँक तयार केली जाऊ शकते.

**या बँकांचे विलीनीकरण होण्याची शक्यता**

सरकारच्या या मेगा बँकिंग मर्जर योजनेत खालील बँकांचा समावेश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. इंडियन ओव्हरसीज बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, यूको बँक, पंजाब अँड सिंध बँक.

**कर्मचाऱ्यांसह लाखो ग्राहकांवर परिणाम**

या प्रस्तावित विलीनीकरणाचा परिणाम देशभरातील २,२९,८०० कर्मचारी आणि लाखो ग्राहकांवर होणार आहे. सरकारने कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे आश्वासन दिले असले, तरी प्रत्यक्षात विलीनीकरणानंतर अनेक शाखा एकत्र किंवा बंद केल्या जाऊ शकतात. एकाच प्रकारचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे पदोन्नती, बदली आणि पगारवाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच, काही कर्मचाऱ्यांना इतर राज्यात ट्रान्सफर होण्याची वेळ येऊ शकते. नव्या भरतीच्या संधींवरदेखील मर्यादा येण्याची भीती बँकिंग क्षेत्रात व्यक्त होत आहे.

---------------

## वैद्यनाथ कारखाना देताना

देताना फार वेदना होतात पण शेतकऱ्याचे हित पाहून निर्णय घेतल्याचे सांगत स्व.मुंडे साहेबाच्या आठवणींना उजाळा देताना त्या गहिवरून गेल्या होत्या. या सोहळ्याला कारखान्याचे चेअरमन बोत्रे पाटील, संचालक मंडळ, सदस्य आणि स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना परळी, अंबाजोगाई, पांगरी परिसरात स्थानिक पातळीवर ऊस प्रक्रिया सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना उभारला होता. या कारखान्याचे साडेसात हजारांहून अधिक संस्थापक सभासद आहेत. मात्र, मागील काही वर्षांपासून बँक कर्जबोजा, थकबाकी आणि आर्थिक अडचणींमुळे कारखान्यावर दिवाळखोरीची वेळ आली. परिणामी युनियन बँकेने हा कारखाना ओंकार साखर कारखान्याला विक्री केला. गाळप शुभारंभ सोहळ्यात बोलताना मंत्री पंकजा मुंडे भावूक झाल्या. त्या म्हणाल्या, आम्ही या ठिकाणी आल्यावर बाबा आम्हाला नेहमी काहीतरी सांगायचे. माझा मुलगा तेव्हा दीड वर्षांचा होता. त्याला त्यांनी साखरेच्या पोत्यात ठेवले होते, अशी आठवण करून देत त्या गहिवरल्याचे पाहायला मिळाले. वैद्यनाथ कारखाना देताना मला प्रचंड वेदना झाल्या, अशा भावना देखील त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. त्यांच्या या वक्तव्यानंतर सभागृहात क्षणभर भावनिक वातावरण निर्माण झाले. दरम्यान, वैद्यनाथ साखर कारखाना विक्रीच्या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. या विक्रीविरोधात रविकांत तुपकर यांच्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी केली होती. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा आरोप केला होता की, कारखाना विक्रीचा निर्णय कोणत्याही सभासद किंवा शेतकऱ्यांना विश्वासात न घेता घेण्यात आला. कारखाना १३२ कोटी रुपयांना ओमकार ग्रुपला विकण्यात आला असून, १४ ऑगस्ट २०२५ रोजी अंबाजोगाई येथील रजिस्ट्री कार्यालयात ही नोंद करण्यात आली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते कुलदीप करपे यांनी परळी तालुक्यातील कारखाना अंबाजोगाईमध्ये कसा विकला जाऊ शकतो? असा सवाल उपस्थित केला होता. याशिवाय, करारावर पंकजा मुंडे आणि संचालक मंडळाच्या सह्या असल्या तरी त्यांच्या बहिणी यशश्री मुंडे यांची सही नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे यशश्री मुंडे यांनी हा व्यवहार मान्य केला नव्हता का? असा सवालही त्यांनी विचारला होता.

------------

## भारताविरोधात बायो केमिकल

विरोधात केला असल्याचे बोलल्या जात आहे. रिसिन ही एक पांढरी, गंधहीन आणि चवहीन पावडर आहे. ती खाल्ल्याने, श्वास घेताना किंवा इंजेक्शनने शरीरात टाकली जाऊ शकते. सुदैवाने ती संसर्गजन्य नाही. ती एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरत नाही. हवेत सोडल्यास किंवा पाण्यात मिसळल्यास ती व्यापक नुकसान करू शकते. एरंडीच्या बियांवर प्रक्रिया झाल्यानंतर उरलेल्या कचऱ्यांतून हे भयंकर विष तयार केले जाते. हे विष पोटात गेले तर श्वासोच्छ्वासास त्रास, घशावर सूज येते. इंजेक्शनच्या माध्यमातून ते शरीरात गेले तर शारीरिक क्रियांवर गंभीर परिणाम होऊन ते अत्यंत घातक ठरते. गुजरात प्रकरणातील आरोपी डॉक्टरने ४ लिटर एरंडेल तेल खरेदी केले आणि कचऱ्यापासून रिसिन बनवण्याचा प्रयत्न केला. हे विष बनवणे कठीण नाही, परंतु ते ओळखणे आणि प्रतिबंध करणे आवश्यक आहे, असे तज्ज्ञ सांगतात. रिसिन जगातील सर्वात घातक विषापैकी एक आहे. हे शरीरातील आतून पेशी नष्ट करते. यावर कोणताही इलाज किंवा उतारा नाही, फक्त लक्षणांवर उपचार केले जाऊ शकतात. २०२२ मध्ये बेल्जियममध्ये एका महिलेने केस गळती रोखण्यासाठी ६ बिया खाल्ल्या, त्यातून तिला खूप वेदना, उलटी झाली परंतु वेळीच उपचार केल्याने ती वाचली. भारतात या वनस्पतीची शेतीही होते, त्याचा कचराही सहज मिळतो. त्यामुळे दहशतवाद्यांनी याचा वापर करणे पसंत केले. गुजरातच्या डॉक्टरने शहरांमध्ये हल्ला करण्याची योजना बनवली होती. मोठ्या प्रमाणात रिसिन हवेत सोडले असते तर असंख्य मनुष्यांना त्याचा त्रास झाला असता.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५


## अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत भेंड येथील शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल



**गेवराई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करत गेवराई शहरासह तालुक्यातील भाजपा-सेनेचे शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत प्रवेश करत असुन गेवराई नगर पालिका निवडणुकीत होत असलेल्या या प्रवेशामुळे बदामराव पंडित - लक्ष्मण पवार गटात खळबळ उडाली आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे भेंड बु. येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते तथा सरपंच रविंद्र जंगले, उपसरपंच विवेक वाव्हळ यांच्यासह अभिमान कोळपे, बाबा खरात, शंकर पवार, उदय जंगले, लखन जंगले, कृष्णा जंगले, सुरज जंगले, प्रदीप जंगले, युवराज जंगले, माऊली कोळपे, बाबासाहेब जंगले, वशिष्ठ जंगले, बापूराव वाव्हळ, अशोक वाव्हळ, नेमाजी गायकवाड, कल्याण वाव्हळ, राजू शिंदे, गोपाळ कोळपे, बालाजी जंगले, मांजरम जंगले, बालाजी गायकवाड, लक्ष्मण सोळुंके, बळीराम बडेकर, सखाराम कोळपे ,देवराव जंगले, अच्युत कोळपे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भेंड बु. येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये स्वागत केले. भेंड येथे झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, शरद कबले, योगेश गाडे, रवी शिर्के, आकाश जाधव, अशोक शिंदे, विठ्ठल गिरी बाबा रडे, शेखर हुंबे, शिवाजी शिंदे आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माता व बालसंगोपन इमारतीसाठी लिफ्ट व फर्निचरचा निधी देण्याची मागणी

### जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालय परिसरात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत तब्बल २१ कोटी रुपये खर्चून उभारलेली १०० खाटांची माता व बालसंगोपन इमारत निधीअभावी आजही कार्यान्वित न झाल्याने धुळखात पडली आहे. लिफ्ट आणि फर्निचरच्या निधीअभावी इमारतीचा वापर सुरू होऊ शकलेला नाही.दरम्यान, जिल्हा रुग्णालयाची जुनी इमारत अपुरी पडत असून, त्याच इमारतीत सोनोग्राफी व एक्स-रे विभाग कार्यरत आहेत. दररोज सुमारे ४०० हून अधिक रुग्ण तपासणीसाठी येतात, मात्र व्हरांड्यात केवळ १५ ते २० रुग्णांसाठीच बसण्याची सोय असल्याने गर्भवती महिलांना ताटकळत उभे राहावे लागते. आयपीडी विभागातही गर्दी वाढल्याने उपचारात अडचणी निर्माण होत आहेत.



या पार्श्वभूमीवर डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस च-हाटकर आणि शेख मुबीन यांनी सोमवारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्यामार्फत पालकमंत्री अजितदादा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले.या निवेदनात नियोजन समितीकडून लिफ्ट व फर्निचरसाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

१०० खाटांच्या माता व बालसंगोपन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून लिफ्ट व फर्निचरच्या उर्वरित कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे.

इमारतीमध्ये एकूण ४ लिफ्ट असून त्यापैकी ३ लिफ्टचे काम पूर्ण झाले आहे. निधी मिळताच उर्वरित लिफ्ट व फर्निचरचे काम पूर्ण करून इमारत कार्यान्वित केली जाईल,''

असे डॉ. संजय राऊत यांनी सांगितले.

### आंदोलन आचारसंहितेमुळे स्थगित

पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेसह जिल्हा रुग्णालय आवारात आज ''अजितदादा के नाम पे दे दो बाबा'' हे लक्ष्यवेधी भिक मांगो आंदोलन होणार होते.

मात्र, नगरपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगीतले.

## विराज शेकडे याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ मध्ये झालेल्या स्पर्धेत मैदानी खेळात थाळीफेक या खेळ प्रकारांमध्ये विराज ने विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा महाराष्ट्र शासन आयोजित जिल्हा क्रीडा कार्यालय रत्नागिरी तालुका चिपळूण क्रीडा संकुल डेरवण येथे निवड झाली आहे. आता तो छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या यशानंतर आता तू राज्य सुद्धा जिंकशील अशा पद्धतीचे आशा सर्व मार्गदर्शक व जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर साहेब तसेच



ॲथलेटिकचे अविनाश पाटील साहेब तालुका क्रीडा समन्वयक वाहेद सर तसेच वेळोवेळी मार्गदर्शन करणारे श्री पठाण सर श्री बालाजी नागरगोजे सर या सर्वांनी विराजचे अभिनंदन करून पुढील क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. चि. विराजचे बीड जिल्हा तसेच विभागात सर्वत्र कौतुक होत आहे.

## मोबाईलवरील गेम्स सोडा व परिसराच्या निरीक्षणात रममाण व्हा-डॉ.शुभदा लोहिया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शाळकरी मुलांमधील सोशल मिडिया व गेम्सचे वाढते व्यसन व त्यातून होणाऱ्या अनुचित प्रकारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे, विद्यार्थ्यांमधील मोबाईलचे हे वेड कमी करण्याच्या दृष्टीने पालकांनी व शाळेने प्रयत्न केले पाहिजेत. याच उद्देशाने व दृष्टीकोनातून स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेमध्ये दि. ०८ नोव्हेंबर रोजी इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नवक्षितीज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव श्री. संतोष दादा कुलकर्णी यांनी भूषवले. विद्यार्थ्यांचे मोबाईल व सोशल मिडियाचे व्यसन या विषयावर



समुपदेशन करण्यासाठी अंबाजोगाईतील सुप्रसिद्ध मधुमेह व हृदयरोग तज्ज्ञ श्रीमती डॉ. शुभदा लोहिया यांना मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी लोहिया मॅडम यांनी अत्यंत आत्मियतेने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संवादाच्या माध्यमातून हळूवारपणे गंभीर विषयावर त्यांना बोलते केले.

''आपल्या आसपासच्या परिसराबद्दल जसे की पक्षी, वृक्ष इ. आपल्याला किती अल्प माहिती आहे'' हे त्यांच्या लक्षात आणून दिले, आपण आपल्या भोवतालाचे, परिसराचे पक्ष्यांचे निरीक्षण केले पाहिजे'' हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सोशल मिडिया व गेम्स यांच्यामुळे आपल्या सृजनशीलतेवर कशाप्रकारे वाईट परिणाम होतो हेही त्यांनी त्यांच्या लक्षात आणून दिले. लोहिया मॅडम व मुलांच्या प्रश्न उत्तराच्या संवादातून मुलांना त्यांच्या चुका लक्षात आल्या.

अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात संस्थेचे सचिव मा. श्री. संतोष ( दादा ) कुलकर्णी यांनी सध्याच्या सोशल मिडियाच्या व गेम्सच्या व्यसनाची व्याप्ती विस्तृतपणे मांडली. त्यातून मुलांची होणारी आर्थिक फसवणूक यावरही भाष्य केले. मुलांमधील वाचनाची कमी होणारी आवड व वाढता खोट्या प्रसिद्धीचा हव्यास यावर त्यांनी खंत व्यक्त केली व मुलांना यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती सुरेखाताई रणखांब यांनी तर आभार प्रदर्शन श्री. उल्हास रामदासी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वामी विवेकानंद परिवराने कार्य केले.

## गेवराई शिवसेना व घटक पक्षातील उमेदवारांच्या आज मुलाखती

### इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवालासह उपस्थित रहावे -ॲड. चंद्रकांत नवले

बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झालेले आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करू इच्छित असलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११. ११. २०२५ रोजी मोंढा नाका गेवराई येथे शहर प्रमुख श्री. मुकेश महाजन यांच्या संपर्क कार्यालयामध्ये आयोजित केले आहेत. शिवसेना व घटक पक्षातील इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवालासह सकाळी ११.०० ते ०४.०० वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख श्री उद्धव बापू मडके, शहरप्रमुख श्री. मुकेश महाजन व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.



मुलाखतीदरम्यान गेवराई शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक उपस्थित राहणार असून, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम,

लोकाभिमुख, विकासाभिमुख आणि समाजकार्यासाठी जास्तीत जास्त वेळ देणारा चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे ॲड. चंद्रकांत नवले यांनी स्पष्ट केले. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी सांगितले.

## अंबाजोगाई शहरातील युवकांचा राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील बलुत्याचा मळा परिसरातील अनेक युवकांचा अंबाजोगाई शहरातील माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत सोमवार दि १० रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ज्योतिराम कुरणे यांच्या माध्यमातून प्रवेश केलेल्यामध्ये सौदागर कुरणे, चंद्रकांत राऊत, सुभाष बलूतकर, रंगनाथ मुळे, शाकीर पठाण यांचा समावेश आहे.

अंबाजोगाई शहरात मागील अनेक वर्षांपासून राजकिशोर मोदी हे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहरवासीयांची सेवा करत आहेत. गेली चाळीस वर्षांपासून अंबाजोगाई शहराचा विकास करून संपूर्ण शहरात राजकिशोर मोदी यांनी आपली




**नगर परिषद निवडणूकीच्या रणधुमाळीत शहरातील विविध परीसरातू अनेक युवकांचा राष्ट्रवादी पक्षात ओढा**

पकड मजबुत केली आहे. ज्योतिराम कुरणे हे प्रभागातील विविध सामाजिक उपक्रमांतुन समाजसेवा करत आहे. त्यामुळे त्यांचा संपर्क देखील मोठया प्रमाणात आढळून येतो आहे.

गेली अनेक वर्षे केलेल्या कामाची शिदोरी म्हणूनच शहरातील लहान थोरांपर्यंतच्या मनामनामध्ये राजकिशोर मोदी हे घर करून आहेत. त्यामुळेच आजही अंबाजोगाई शहरातील अनेक युवक राजकिशोर मोदी यांच्यावर विश्वास ठेवत यांच्याकडे आकर्षिले जात आहेत. सध्या नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून प्रत्येक पक्ष आपापल्या पक्षाची विचारधारा मतदारांपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याच प्रयत्नाच्या बळावर शहरातील विविध परिसरातील युवक तथा जेष्ठ व महिला देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेकडे आकर्षिल्या जात आहेत.

## विद्यार्थ्यांनी वाचनाचा छंद जोपासावा-केंद्रप्रमुख केंद्रे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील संकल्प विद्या मंदिर येथे प्रथम सत्र परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व हिंदी विषयातील मेला या पाठाशी निगडित आनंदनगरीचे आयोजन अगदी उत्सवामध्ये करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी कर्तव्यदक्ष रविवार पेठ चे केंद्रप्रमुख श्री.विश्वनाथ केंद्रे साहेब,युवा उद्योजक श्री.तात्याराव निकम शाळेचे सचिव श्री कैलास चोले सर,शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती कौशल्य शिंदे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने करण्यात आली प्रथम माता योगेश्वरी च्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी मंचावर उपस्थित पाहुण्यांचा शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रथम सत्र परीक्षेमध्ये प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य देऊन गौरव



करण्यात आला.यावेळी युवा उद्योजक श्री तात्याराव निकम यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायामध्ये यशस्वी होण्याचे वेगवेगळे उदाहरण देऊन व्यवसायामध्ये पुढे कसे जायचे याचे मार्गदर्शन केले तसेच व्यवसाय करत असताना यशस्वी होण्या साठी सातत्य परिश्रम व जिद्द त्यासोबतच शिक्षणाची जोड अत्यंत आवश्यक आहे असे नमूद केले.तर केंद्रप्रमुख श्री विश्वनाथ केंद्रे साहेब यांनी शाळेची शिस्त,शाळा राबवत असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर वाचनाचा छंद जोपासा असे ही नमूद केले संकल्प विद्या मंदिर शाळा अंबाजोगाई शहरामध्ये एक वेगळी ओळख निर्माण केली आहे ही ओळख एकट्या कुठल्याही व्यक्तीची नसते त्या मागे परिश्रम घेणारे तुम्ही सर्व शिक्षक ,पालक यांच्या सातत्य व परिश्रमाची आहे यावेळी प्रथम ,द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. दुसऱ्या सत्रामध्ये आनंदनगरी चे पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी पाहुण्याने मनसोक्त विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉलवर विविध खाद्यपदार्थाचा आनंद घेतला. शाळेत विद्यार्थ्यांना व्यापारी जीवनाचा व्यवहारिक जीवनाचा अनुभव मिळावा म्हणून आनंदनगरी चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी गट करून विविध खाद्यपदार्थाचे तसेच विविध खेळाचे एकूण १०० + स्टॉल लावले होती . विद्यार्थ्यांना शालेय जीवनासोबत व्यावहारिक जीवनामध्ये कसे वागावे ? नफा तोटा या संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणाच्या माध्यमातून समजावून सांगणे तसेच एक चांगला व्यावसायिक होण्यासाठी काय करावे लागते ? या सर्व गोष्टींचा अनुभव देणे हा मानस देऊन शाळेने हा उपक्रम राबविला असल्याचे मत ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती कौशल्य शिंदे मॅडम यांनी प्रास्ताविक के मध्ये व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.भक्ती गायकवाड ,कु. निकम अक्षरा आभार कु.तनिष्का मुंडे विद्यार्थ्यांनी अगदी उत्कृष्ट केले.या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख व हिंदी विषयाचे शिक्षक यांनी अगदी उत्कृष्टरित्या केले होते.यासाठी सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमणी करण्यात आली.

## कॉ.महंतय्या स्वामी यांचे वृद्धापकाळाने निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र विद्यालय येथील सेवानिवृत्त सहशिक्षक,कॉ.महंतय्या मल्लिकार्जुन स्वामी यांचे सोमवारी,(दि.१०रोजी) सकाळी वार्धक्याने निधन झाले.



माजी खासदार कॉ.गंगाधर आप्पा बुरांडे यांचे स्वकीय म्हणून महंतय्या स्वामी सर्वश्रुत होते.सन १९९५- २०००साली ग्रामपंचायत सदस्य पदावर त्यांनी काम केले. जीवनात कॉम्रेडच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार हेच ध्येय महंतय्या स्वामी यांनी जोपासले. सोमवारी सायंकाळी चार वाजता त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा मंडळाचे अध्यक्ष ॲड . अजय बुरांडे यांच्यासह महाराष्ट्र विद्यालयाचे संचालकआजी-माजी सर्व शिक्षक वृंद, पंचक्रोशीतील वेगवेगळ्या राजकीय सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक व स्वामी यांचे नातेवाईक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी,तिन विवाहीत मुले, विवाहित मुली,नातवंडे,असा परिवार आहे.सेवानिवृत्त सहशिक्षक शंभूलिंग स्वामी यांचे ते बंधू होत.

पान ६ वरून...

### नगर पालिका निवडणूक पूर्ण

कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नमूद केले. लवकरच शिवसेना आपले उमेदवार जाहीर करून पूर्ण ताकदीने नगर पालिका निवडणूक लढवेल आणि बीड नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवेल असा ठाम विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला.

### वडवणीमध्ये धनंजय मुंडे

येत आहे. श्री. धनंजय मुंडे साहेब हे ज्येष्ठ ओबीसी नेते तथा लोकप्रतिनिधी असून राज्याचे विरोधी पक्षनेते व तीन वेळा कॅबिनेट मंत्री राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, याची शासनाने तात्काळ दखल घेणे गरजेचे आहे. अशी मागणी निवेदनाद्वारे यावेळी करण्यात आली

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना जाहीर वक्तव्य करण्यास मनाई करण्यात यावी, अन्यथा सकल ओबीसी समाजाच्या वतीने सबंध वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल व याची सर्वस्वी जवाबदारी शासन व प्रशासनाची राहील असा इशारा देण्यात आला.

वडवणी शहरामध्ये आज दि.१०-११-२०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस समर्थकांनी दुग्धाभिषेक घातला.

मागील काही दिवसापासून माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे खोटे केले गेले आहेत, इथून पुढे खोटे व बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत असा इशारा ही यावेळी माजी नगरसेवक सतीश बाप्पा बडे, अमोल राजे आंधळे, रमेश मुंडे, विकास आडे, भास्कर मुंडे, गोरख पवार, रामधन नागरगोजे, बळीराम नागरगोजे, किशोर चाटे, वैभव वावधाने, अंकुशराव तुरे, कृष्णा लांब, बापूराव सरवदे, विराज राठोड,विकी राठोड, रंजीत वडणे, राजाभाऊ जाधव, कृष्णा शिंदे, सुमंत आंधळे, शुभम जायभाये, फुलचंद मुंडे, अमोल नागरगोजे,व इतर उपस्थित ओबीसी समाज आणि समर्थकांनी दिला आहे.

### बीड न्यायालय परिसरात

या कारवाईत मेहरबान सपोनी सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार जाधव, पोलीस अंमलदार राहुल घाडगे आणि चालक नारायण वाघमारे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या कारवाईच्या निमित्ताने जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप यांनी जनतेला आवाहन केले की,कोर्ट परिसरात वाहन पार्क करताना नियमांचे पालन करून व्यवस्थित पार्किंग करा, जेणेकरून सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही,असे ते म्हणाले.वाहतूक शाखेच्या या कारवाईमुळे कोर्ट परिसरातील वाहतूक शिस्तीबाबत जनतेत जागरूकता निर्माण झाली असून, पुढील काळातही अशा कारवाया सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### ग्रामीण भागातील खेळाडूंना

असद,अर्जुन कुऱ्हाडे,पत्रकार आर आर बहिर,महेश मरकड,कृष्ण खटके, इंजि.अजय हाते,कॉलेज चे प्राचार्य भारत चव्हाण सर, प्रा.चोरमोले यांच्यासह क्रिकेट खेळण्यासाठी आलेले खेळाडू टीम,प्रेक्षक युवक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जाहीरनामा

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की अर्जदार नामे निवास पी रंगनाथ काकडे रा. चिंचोटी ता. वडवणी जिल्हा बीड त्यांची मुलगी नामे संस्कृती निवास काकडे हिचा जन्म दिनांक ७/ ११/ २०१० रोजी चिंचोटी ता. वडवणी जिल्हा बीड येथे राहत्या घरी झाला असून अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत चिंचोटी ता

वडवणी जिल्हा बीड यांच्या नोंदवही मध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

करिता वरील नमूद व्यक्तीची जन्मतारीख व जन्म ठिकाण कायदेशीर नाही असे कोणास या कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यायचे असेल तर जाहीरनाम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने या कार्यालयात स्वतः हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की जर विहित मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित झाल्यास उक्त नमूद जन्मतारीख व जन्म ठिकाण याची नोंद कायदेशीर असल्याबाबत त्या अनुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार वडवणी**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५
४

# मध्य प्रदेशात सोयाबीनला १३०० रुपये भाव फरक ; महाराष्ट्रात मात्र खरेदीला गती नाही



मुंबई : मध्य प्रदेश सरकारने सोयाबीनसाठी भावांतर योजनेतून शेतकऱ्यांना १३०० रुपयांचा भावफरक जाहीर केला आहे. सरकारने सोयाबीनचा मॉडल भाव प्रति क्विंटल ४०३३ रुपये काढला. हमीभाव आणि मॉडल भावात आलेला फरक १३ तारखेला शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र अजूनही खरेदीला गती नसल्याचे दिसत आहे.

मध्य प्रदेशात २४ ऑक्टोबरपासून भावांतर भुगतान योजनेतून सोयाबीन खरेदीला सुरुवात करण्यात आली. खरेदी सुरू झाल्यापासून ७ नोव्हेंबरपर्यंतच्या १५ दिवसांसाठी ४०३३ रुपये मॉडल भाव काढण्यात आला. यंदा सरकार दर १५ दिवसाला मॉडल भाव काढणार आहे. त्यामुळे कमी भावात माल विकलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. मध्य प्रदेशात आतापर्यंत ३६ लाख शेतकऱ्यांनी भावांतरमधून सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली आहे. नोंदणी केल्यानंतर शासन मान्य बाजारांमध्ये माल विकल्याच्या पावत्या दिल्यानंतर भावफरक दिला जाणार आहे. त्यामुळे मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्रात भावांतर योजनेऐवजी हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. मात्र सोयाबीन खरेदीसाठी अजून नोंदणीच सुरू आहे. खरेदी केंद्रांची संख्या तुटपुंजी असल्यामुळे नोंदणीसाठी शेतकऱ्यांची गर्दी होत आहे.

खरेदी केंद्रांवर पॉस मशिनच्या अडचणी आणि सर्व्हरच्या अडचणी असल्याने नोंदणीला उशीर होत आहे. सोयाबीनची प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. परंतु अद्याप मान्यता मिळालेल्या खरेदी केंद्रांची संख्या २५० पेक्षा जास्त नाही, असे सूत्रांनी सांगितले. खरेदी केंद्रांना मान्यता मिळाली तरी लगेच खरेदी सुरू होण्यासाठी बारदाना आणि इतर साहित्य तसेच शेतकऱ्यांची नोंदणी आवश्यक आहे. आता नवे केंद्रे कधी सुरू होणार, त्यांच्याकडे शेतकरी नोंदणी कधी करणार आणि प्रत्यक्ष खरेदी कधी सुरू होणार, असे प्रश्न खुद्द खरेदी केंद्रचालक उपस्थित करत आहेत.



## राज्यातील रब्बी पेरणीचे क्षेत्र आठ लाख हेक्टरवर पोहोचले

पुणे : राज्यात आतापर्यंत सुमारे आठ लाख हेक्टरवर रब्बी पिकांची लागवड झाली असून, ज्वारीची पेरणी सरासरी क्षेत्राच्या २६ टक्क्यांपर्यंत झाली आहे, तर गव्हाची पेरणी केवळ तीन टक्के झाली आहे. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता चांगली असल्याने गहू, हरभरा आणि मक्याचे क्षेत्र वाढेल. असा अंदाज आहे.

या हंगामासाठी सरासरी क्षेत्राच्या किमान आठ लाख हेक्टर क्षेत्रावर अधिक पिकांची लागवड होईल असा अंदाज आहे, अशी माहिती कृषी संचालक रफीक नाईकवडी यांनी दिली. राज्यात ५७ लाख ८० हजार हेक्टरवर रब्बी पिकांची लागवड केली जाते. त्यापैकी सर्वाधिक २५ लाख १६ हजार हेक्टर क्षेत्र एकट्या हरभरा पिकाचे आहे. त्यानंतर रब्बी ज्वारीचे क्षेत्र १४ लाख ९५ हजार हेक्टर इतके आहे, तर गव्हाखालील क्षेत्र ११ लाख ८० हजार हेक्टर आहे. राज्यात यंदा अतिवृष्टीमुळे विहिरी, तलाव, धरणे यांत पाण्याची उपलब्धता तुडुंब असल्याने क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. त्याबाबत कृषी विभागाचे विस्तार संचालक रफीक नाईकवडी म्हणाले, राज्यात सरासरी ५७लाख ८० हजार हेक्टरवर रब्बी पिकांची पेरणी होत असली तरी यंदा पाण्याची उपलब्धता चांगली आहे. त्यामुळे हे क्षेत्र ६५ लाख हेक्टरपर्यंत जाईल अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

# गाजरगवत नियंत्रणाच्या सोप्या पद्धती



पांढरीफुली, चटकचांदणी तसेच काँग्रेस गवत अशा विविध नावांनी गाजरगवत ओळखले जाते. शास्त्रीय भाषेत याला 'पार्थेनियम हिस्टेरोफोरस' असे म्हटले जाते. या गवताचा प्रसार अमेरिकेतील मेक्सिको येथून जगभरात झाला आहे.

गाजरगवत हे बारमाही तण असून अतिशय वेगाने वाढते. गाजरगवताच्या झाडाला पांढऱ्या रंगाची असंख्य फुले येऊन त्यापासून बी निर्मिती होते. या बिया रंगाला काळसर, लंब वर्तुळाकार, लहान आणि वजनाने हलक्यात असतात. बिया वजनाने हलक्या असल्याने वाऱ्यामार्फत दूरवर त्यांचा प्रसार होतो. या गवताने देशभरातील लाखो हेक्टरपेक्षा अधिक जागा व्यापली आहे. शेतातील मुख्य पिकासोबत अन्नद्रव्यांसाठी या गवताची स्पर्धा होऊन पीक उत्पादनात मोठी घट येते. आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या या गवताच्या समूळ निर्मूलनासाठी दरवर्षी १६ ते २२ ऑगस्ट या सप्ताहात 'गाजरगवत जागरूकता सप्ताह' आयोजित केला जातो हेही विशेष.

आढळणाऱ्या जागा : शेतीतील बांध, पडीक जमीन, चराऊ कुरणे, औद्योगिक वसाहती, रस्ते, रेल्वेमार्गाच्या बाजूने याशिवाय पाण्याच्या ठिकाणी या तणांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. तसेच तूर, कापूस, ज्वारी, भुईमूग, ऊस, भाजीपाला व फळ पिके इत्यादी सर्व पिकांमध्ये गवताचा प्रादुर्भाव आढळून येतो

आरोग्यावर होणारे दुष्परिणाम

दुष्परिणाम : गाजरगवत खाण्यात आल्यामुळे मानवी आणि जनावरांच्या आरोग्यावर दुष्परिणाम आढळून आले आहेत. शेतातील गाजरगवत उपटून टाकताना त्याचे परागकण श्वसनावाटे शरीरात जाऊन खोकला, शिंका, दमा आदी श्वसनविकार तसेच अंगाला खाज, त्वचा विकार इत्यादी उद्भवण्याची शक्यता असते. या वनस्पतीला कडवट चव आणि विशिष्ट असा दुर्गंधीयुक्त वास येतो. त्यामुळे जनावरे हे गवत सहसा खात नाहीत. जनावरांनी खाल्यास त्यातील विषारी घटक दुधामध्ये उतरतात.

एकात्मिक नियंत्रण : गाजर गवत निर्मूलनासाठी सामूहिकरीत्या गाव पातळीवर सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. एकाच वेळी गावपातळीवर सामूहिकरीत्या गाजरगवत फुलावर येण्यापूर्वी नष्ट केल्यास त्याच्या वाढीस आळा बसून प्रभावी नियंत्रण मिळण्यास मदत होते.

प्रतिबंधात्मक उपाय : शेतातील गाजरगवत फुलावर येण्यापूर्वी मुळासकट उपटून नष्ट करावे.


कंपोस्ट खड्डे, ओलिताचे दांड, शेतातील बांध, शेताच्या कडेचे बांध, रेल्वेमार्ग, रस्ते, पडीक जमिनी इत्यादी ठिकाणी उगवलेले गाजरगवत मुळासकट उपटून टाकावे. त्यानंतर त्याचा ढीग करून वाळल्यानंतर जाळल्यास पहिल्या पावसात उगवून आलेल्या गाजर गवताचे उच्चाटन होईल. पावसाळा संपल्यावर वाळलेले गाजर गवत दक्षता घेऊन जाळून टाकावे. रासायनिक नियंत्रण : उभ्या पिकांतील गाजर गवत निंदणी, खुरपणी, कोळपणीद्वारे मुळासकट काढून टाकावे. पडीक जमिनीत म्हणजेच कोणतेही पीक, फळझाडे नसलेल्या ठिकाणी, ग्लायफोसेट (४१ टक्के एस. एल.) ८ ते १० मिलि किंवा २,४-डी (५८ टक्के) २ ते ३ मिलि प्रति लिटर यानुसार तणनाशकाची शिफारस आहे. तथापि २,४-डी चा वापर करताना परिसरात द्विदल पीक असलेल्या शेतात फवारणी जाणार नाही याची दक्षता घ्यावी. उभ्या पिकात तणनाशकाचा वापर करू नये. उगवणपूर्व तणनाशकाचा वापर करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

नैसर्गिक व्यवस्थापन : विविध लागवडी पद्धतीप्रमाणे विविध पिकांची फेरबदल करूनही गाजरगवताची समस्या कमी करता येऊ शकते. उदा. ज्वारी, झेंडू, धैंचा, बरसीम आदींमुळे प्रसार कमी होतो तसेच वाढ खुंटते.

यांत्रिक पद्धत : यंत्राच्या साह्याने किंवा विळ्याने गाजरगवत मुळासकट काढून विल्हेवाट लावावी. यासाठी पावसाळा हा उत्तम काळ आहे. योग्यप्रकारे नष्ट न केल्यास ते पुन्हा उगवण्याची शक्यता असते. गाजरगवत उपटताना हातामध्ये हातमोजे घालावेत. चेहऱ्यावर रुमाल किंवा कापड बांधावे.

जैविक नियंत्रण : गाजरगवताचे जैविक नियंत्रणासाठी मेक्सिकन भुंग्यांचा (झायगोग्रामा बायकोलोरॅटा) यांचा वापर प्रभावी ठरतो. हे भुंगे गाजरगवत खाऊन उपजीविका करतो. ही अत्यंत कमी खर्चिक आणि पर्यावरणपूरक नियंत्रण पद्धती आहे. हे भुंगे पाऊस पडल्यानंतर प्रति हेक्टरी ५०० प्रमाणे सोडावेत.

# या पद्धतीने करा बाजरी लागवड; होईल फायदा



बाजरी हे पीक खरीप व रब्बी हंगामात घेतले जाते. मात्र खरीप बाजरीचे पीक हे फायदेशीर ठरते. हे पीक पाण्याचा ताण सहन करणारे कमी पाण्यावर येणारे पीक आहे. तसेच धान्याबरोबरच जनावरांना चारा देणारे पीक आहे. या पिकाचे योग्य व्यवस्थापन केल्यास चांगले उत्पादन मिळवणे शक्य होते. पाऊस उशिरा किंवा कमी प्रमाणात झाला तरी इतर तृणधान्यापेक्षा हे पीक अधिक धान्य व चारा उत्पादन देते.

जमिनीची निवड कशी करावी? बाजरी पिकासाठी हलकी ते मध्यम जमीन असणे आवश्यक आहे. तसेच पाण्याचा उत्तम निचरा असणारी जमीन बाजरी पिकासाठी चांगली समजली जाते. हलक्या जमिनीत हे पीक घ्यायचे असल्यास सरी-वरंबा पद्धत फायदेशीर ठरते.

महत्त्वाचे वाण कोणते आहेत?

फुले आदिशक्ती, फुले महाशक्ती, श्रद्धा, सबुरी या संकरित जाती तसेच धनशक्ती ही सुधारित जात बाजरीसाठी निवडावी. बियाण्याचे प्रमाण बाजरी लागवडीसाठी पेरणीसाठी हेक्टरी तीन ते चार किलो बियाणे वापरावे.

पेरणी कशी करावी?

पेरणी दोन ते तीन सेंटीमीटर पेक्षा जास्त खोलीवर करणे टाळावे किंवा करू नये. बी जास्त खोलवर पडल्यास उगवण होत नाही. कोरडवाहू बाजरी ४५ १५ सें.मी. अंतरावर तर पाण्याची सोय असल्यास बागायती बाजरी ३० १५ सें.मी. अंतरावर पेरणी करावी

खत व्यवस्थापन कसे करावे?

हलक्या जमिनीसाठी ४० कि.ग्रॅ. नत्र, २० कि.ग्रॅ. स्फुरद, २० कि.ग्रॅ. पालाश तर मध्यम जमिनीत ५० कि.ग्रॅ. नत्र, २५ कि.ग्रॅ. स्फुरद व २५ कि.ग्रॅ. पालाश प्रति हेक्टरी द्यावे. पेरणीच्या वेळी नत्राचा अर्धा हप्ता आणि स्फुरद व पालाश पूर्ण द्यावे तर पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी उरलेल्या नत्राचा अर्धा हप्ता जमिनीत ओला असताना द्यावा. पिकाच्या अधिक उत्पादनासाठी दहा किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टरी पूर्वमशागतीच्या वेळेस जमिनीतून द्यावे. स्फुरदाची मात्रा सिंगल सुपर फॉस्फेटमधून दिल्यास पिकास कॅल्शिअम व सल्फर ही अतिरिक्त सूक्ष्म अन्नद्रव्येही मिळतात. (माती परीक्षणानुसारच रासायनिक खते द्यावीत.)

रोग नियंत्रण : केवडा किंवा गोसावी - पीक २० ते २१ दिवसांचे झाल्यावर रोगट झाडे उपटून टाकावी. पेरणीनंतर १४ दिवसांनी पिकावर कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० टक्के हेक्टरी १ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. यानंतर ८ ते १० दिवसांनी दुसरी फवारणी करावी किंवा मेटॅलॅक्झील एम. झेड ७२ पावडर ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर २० दिवसांनी फवारावे. गोसावी किंवा केवडा रोगग्रस्त शेतात पुन्हा बाजरी घेऊ नये. ४. रोगास बळी न पडणारे वाण वापरावेत.

अरगट - २० टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया करावी. कणसे बाहेर पडण्यापूवी थायरम (०.१० ते ०.१५ टक्के) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड थायरम (२:१) ५०० ते ६०० ग्रॅम या प्रमाणात दोन ते तीन वेळा फवारणी करावी. उशीरा पेरणी करू नये, रोगट झाडे उपटुन नष्ट करावीत. खोल नांगरट व पिकाची फेरपालट करावी.

कीड नियंत्रण : सोसे अथवा हिंगे - सकाळच्या वेळी वारा शांत असतांना कणसावर मिथिल पॅराथिऑन (फॉलीडॉल) २ टक्के भुकटी हेक्टरी २० किलो याप्रमाणात धुरळावी. ४) खोड किडी किंवा खोड माशी मेलॉथिऑन ५० टक्के प्रवाही १४ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

लष्करी अळी किंवा केसाळ अळी - थिल पॅराथिऑन (फॉलीडॉल) २ टक्के भुकटी हेक्टरी २० किलो धुरळावी.

आंतरमशागत व तण व्यवस्थापन : चांगल्या उगवणीनंतर मधल्या काळात पावसाचा खंड पडला तर डवरणी करावी जेणेकरून जमिनीच्या भेगा बुजतील व मातीमध्ये ओलावा टिकून राहील. यालाच डस्ट मल्चिंग म्हणतात. गरजेनुसार बाजरी पिकात तणनाशकांचा वापर करता येतो. यासाठी ॲट्राझीन किंवा सिमाझीन हे उगवणपूर्व (पेरणीनंतर परंतु बी उगवण्यापूर्वी) तणनाशक हेक्टरी १.५ ते २ किलो ६०० ते ७०० लिटर पाण्यासोबत फवारावे. फवारणी नंतर १५ ते २० दिवस पिकात खुरपणी किंवा डवरणी करू नये. तसेच पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी २,४-डी (फक्त सोडिअम साल्ट) हे उगवणनंतर तणनाशक हेक्टरी १२५० ग्रॅम या प्रमाणात ६०० लिटर पाण्यासोबत तणावर फवारावे. तणनाशक फवारणीपूर्वी तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा.

पाणी व्यवस्थापन : बाजरी पिकास फुटवे येण्याच्या वेळी, पीक पोटरी अवस्थेत असताना आणि कणसात दाणे भरताना जमिनीत पुरेसा ओलावा असणे गरजेचे आहे. या अवस्थेत जमिनीत पुरेशी ओल नसल्यास पिकास संरक्षित ओलित म्हणून पावसाचा अंदाज बघून हलकेसे पाणी द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०५ : नॉर्वेच्या जनतेने सार्वमतात प्रजासत्ताक होण्याऐवजी राजसत्ताच कायम ठेवण्याचा कौल दिला.
१९१८ : ऑस्ट्रिया प्रजासत्ताक बनले.
१९२५ : अमेरिका व इटली या दोन देशांनी आजच्याच दिवशी शांतता करारावर स्वाक्षरी केली होती.
१९२७ : सोविएत कम्युनिस्ट पक्षातुन लिऑन ट्रॉटस्कीची हकालपट्टी करण्यात आल्यामुळे जोसेफ स्टॅलिनच्या हातात सर्व सत्ता गेली.
१९३० : पहिल्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९३६ : केरळ येथील मंदिरे सर्व हिंदू धर्मियांकारिता खुले करण्यात आले होते.
१९४५ : पुण्यात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांची राजकीय परिस्थितीवर साडेदहा तास चर्चा झाली.
१९५६ : आजच्याच दिवशी मोरक्को, सुदान आणि ट्युनिशिया हे देश संयुक्त राष्ट्र या जागतिक संघटनेत समाविष्ट झाले होते.
१९५६ : मोरोक्को, सुदान आणि ट्युनिशियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९६७ : आजच्याच दिवशी इंदिरा गांधी यांना पंतप्रधान असतांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले होते.
१९९० : टिम बर्नर्स-ली यांनी वर्ल्ड वाइड वेबसाठी औपचारिक प्रस्ताव प्रकाशित केला.
१९९८ : परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना व्हिसाशिवाय मायदेशी येण्याची सुविधा देणारी 'पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजीन' ओळखपत्र योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहीर केले. १५ सप्टेंबर २००२ पासून या योजनेच्या अंमलबजावणीस प्रत्यक्ष सुरुवात झाली.
२००० : १२ नोव्हेंबर हा दिवस 'राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९४७ मधे याच दिवशी महात्मा गांधी यांचे दिल्ली आकाशवाणीवरुन भाषण प्रसारित झाले होते.
२००० : भारताची वूमन ग्रँडमास्टर विजयालक्ष्मी सुब्रम्हण्यम हिने तुर्कस्तानातील इस्तंबूल येथे झालेल्या ३४ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाडमधे वैयक्तिक रौप्यपदक मिळवले.
२००३ : 'शांघाय ट्रान्सरॅपिड' या प्रवासी रेल्वेने ५०१ किमी/तास या वेगाने जाण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला.
२०१५ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशांत आतंकवादी हल्ल्यात ४३ जन मृत्यमुखी पडले होते ह्या हल्ल्याची जबाबदारी आई एस आई संघटनेने स्वीकारली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : बहाउल्ला - बहाई पंथाचे संस्थापक (मृत्यू: २९ मे १८९२ आक्रा, इस्त्राएल)
१८६६ : चीन प्रजासत्ताक चे पहिले अध्यक्ष सन यट-सेन यांचा जन्म. (मृत्यू: १९२५)
१८८० : पांडुरंग महादेव तथा 'सेनापती' बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६७)
१८८९ : रीडर डायजेस्टचे सहसंस्थापक डेव्हिट वॅलेस यांचा जन्म. (मृत्यू: १९८१)
१८९६ : डॉ. सलीम अली - जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक (मृत्यू: २७ जुलै १९८७)
१९०४ : श्रीधर महादेव तथा एस. एम. जोशी - समाजवादी, कामगार नेते, पत्रकार, संयूक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्वर्यू (मृत्यू: १ एप्रिल १९८९)
१९४० : अमजद खान - हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (मृत्यू: २७ जुलै १९९२ मुंबई).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४६ : पण्डित मदन मोहन मालवीय बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: २५ डिसेंबर १८६१)
१९५९ : केशवराव मारुतराव जेधे - स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक. केशवराव व बाबूराव याबंधूंचा सत्यशोधक चळवळीकडे ओढा होता. त्यांनी 'मजूर' हे वृत्तपत्र काढले. (जन्म: ९ मे १८८६)
१९५९ : सेवानंद गजानन नारायण तथा बाळूकाका कानिटकर - अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८८६)
१९६९ : इस्कंदर मिर्झा - पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती (जन्म: १३ नोव्हेंबर १८९८)
१९९७ : वेदाचार्य विनायकभट्ट घैसास गुरुजी - वेदाध्ययन आणि त्याचा प्रसार यासाठी संपूर्ण आयुष्य वाहिलेले आचारनिष्ठ घनपाठी.
२००५ : प्रा. मधू दंडवते - रेल्वे मंत्री, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, अर्थतज्ज्ञ (जन्म: २१ जानेवारी १९२४)
२००७ : भारतीय क्रिकेटर के. सी. इब्राहिम यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १९१९)
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते रवी चोप्रा यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९४६).

# टीईटीप्रश्नी पुनर्विचार याचिकेसाठी शिक्षकांचा मूक मोर्चा

परभणी। प्रतिनिधी

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णया विरोधात महाराष्ट्र शासनाने अद्याप पुनर्विचार याचिका दाखल न केल्याने राज्यातील शिक्षकांत तीव्र नाराजी पसरली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीपासून मुकमोर्चा काढण्यात आला. यात बहुसंख्येने शिक्षकांच्या सहभागातून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १ सप्टेंबर रोजीच्या निर्णयात १ ली ते ८ वीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य ठरविली आहे. या न्यायालयाच्या निर्णयामुळे हजारो कार्यरत शिक्षकांची सेवा संकटात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेश सरकारने या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली असताना महाराष्ट्र शासनाकडून अद्याप कोणतेही पाऊल उचलले गेले नाही. या मुद्यावर राज्यातील विविध शिक्षक संघटनांची बैठक शालेय शिक्षणमंत्री





डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली दि.१ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे झाली होती. त्यावेळी मंत्री भोयर यांनी राज्य शासन लवकरच पुनर्विचार याचिका दाखल करेल, अशी ग्वाही दिली होती. याच आशेवर दि.४ ऑक्टोबर रोजी नियोजित करण्यात आलेले आंदोलन स्थगित करण्यात आले होते. परंतु शासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्याने रविवारी परभणीत शिक्षकांनी एकत्र येऊन मूक मोर्चा काढला. मोर्चा दरम्यान शिक्षक संघटनेच्या वतीने उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने तातडीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, पुनर्विचार याचिका प्रलंबित असताना राज्यातील कार्यरत शिक्षकांवर कोणतीही कारवाई करू नये, शिक्षकांच्या सेवा सुरक्षे संदर्भात शासनाने स्पष्ट आदेश जारी करावेत, शालेय शिक्षण विभागाने शिक्षक संघटनांसोबत तातडीने समन्वय बैठक आयोजित करावी अशा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. मूक मोर्चा दरम्यान शिक्षकांनी कोणतेही नारेबाजी अथवा अराजक न करता शांततेत शासनाच्या भूमिके विरोधात निषेध नोंदविला. संघटनेने म्हटले की, राज्य शासनाने शिक्षकांच्या भावनांचा आदर करून त्वरित सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. अन्यथा राज्यभरात मोठे आंदोलन उभे राहील असा इशारा दिला. सदरील काढण्यात आलेल्या मुक मोर्चात कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य सरचिटणीस सतिश कांबळे, पंजाबराव देशमुख शिक्षक संघटनेचे बाळासाहेब यादव, शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे, प्रा. किरण सोनटक्के, शिक्षक परिषदेचे लक्ष्मण गारकर, शिक्षक सेनेचे सुनिल काकडे, शिक्षक संघाचे शेख नुर यांच्यासह जिल्हयातील शिक्षक व शिक्षिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

जिल्ह्यासह राज्यातील शिक्षकांचा संताप आणि निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता राज्य शासन पुढील काही दिवसांत काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. टीईटी संदर्भातील पुनर्विचार याचिका दाखल न झाल्यास शिक्षक संघटनांकडून राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी निवेदनातून शासनाला देण्यात आला आहे.

## स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले

### औंढा नागनाथ नगरपंचायतचा बेजबाबदारपणा





हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ नगरपंचायतीच्या कारभाराबाबत दिवसेंदिवस साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. नुकतीच दैनिक पुढारीमध्ये मंदिराचे पावित्र्य धोक्यात या मथळ्याखाली आलेल्या वृत्ताची दखल घेऊन खांडेश्वरी मंदिरासमोरील टाकलेल्या कचरा उचलण्याबाबत सारवासारव केल्याचा प्रकार समोर आला आहे. पण कायमस्वरूपी प्रश्न मिटवला जात नाही. तर दुसरीकडे आहे त्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना गेल्या दोन वर्षांपासून पगार मिळत नसल्यामुळे नगरपंचायतचा कारभार चव्हाट्यावर आला आहे.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर मात्र उपासमारीची वेळ आली आहे. गावातील सर्वत्र घाण पाणी पावसाळ्यात तीर्थक्षेत्र आठवे ज्योतिर्लिंग नागेश्वर नागनाथ मंदिर परिसरात येते, याबाबत नागनाथ संस्थानकडून नगरपंचायतीला कित्येकदा पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु, नगरपंचायतीकडून अद्यापही याबाबत कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. गावातील नाले कचऱ्यामुळे तुडुंब भरल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर येत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सोबतच पावसाळाभर नागेश्वर नागनाथाचे मंदिर सुद्धा घाणीच्या विळख्यातच असते. यामुळे भाविक, पर्यटक, संस्था कर्मचारी, पदाधिकारी आणि पुजारी वर्गास नाहक या घाणीच्या त्रासाला सामोरे जावे लागते.

महामार्गावरील खांडेश्वरी समोर गावातील कचरा जमा होत असल्याने नगरपंचायतीच्या नियोजन शून्य कारभारामुळे परिसरात सुद्धा घाणीचे वास्तव्य निर्माण झाले. याबाबतचे वृत्त सर्वत्र प्रकाशित होताच नगरपंचायतीने तात्पुरती मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. महामार्गावर आहे तीच परिस्थिति असल्यामुळे नगरपंचायतीकडून फक्त सारवा सरव केली जात असल्याने प्रशासनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## फुलंब्रीत मराठा समाजाचे जोडे मारो आंदोलन



संभाजीनगर। प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट नुकताच उघड झाला असून, सोशल मीडियावर रेकॉर्डिंग व्हायरल होत आहे. या पार्श्वभूमीवर फुलंब्री तालुक्यातील मराठा समाजबांधव आक्रमक झाले. त्यांनी आमदार धनंजय मुंडे यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करत फुलंब्री पोलिसांना निवेदन देण्यात आले.

समाजबांधवांची येथील बाजार समितीत बैठक झाली. त्यानंतर अर्धा तास आंदोलन करत धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. पोलिस निरीक्षक संजय सहाने यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मनोज जरांगे पाटील यांना जिवे मारण्यासाठी कटकारस्थान करणाऱ्या आ. धनंजय मुंडेंवर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करा, तसेच जे कोणी समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत अशा सर्वांना अटक करा. आता मनोज जरांगे यांच्या जीवास धोका असून, त्यांना तात्काळ झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून मुख्य आरोपीस अटक न झाल्यास येत्या आठ दिवसांनंतर फुलंब्री तालुक्याच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा पोलिस प्रशासनाला निवेदनाव्दारे दिला आहे.

## मार्केटिंग फेडरेशनचे गोदाम बेकायदेशीर पाडल्या प्रकरणी गुन्हे दाखल करा-पानसरे

### या प्रकरणातील दोषींना पाठीशी घालण्याचे काम करू नये

मंठा । प्रतिनिधी

मंठा येथील मार्केटिंग फेडरेशनचे गोदाम बेकायदेशीरपणे पाडण्यात आले असून, या प्रकरणांने वेगळे वळण घेतले आहे. याप्रकरणी दोषीवरील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून तात्काळ कारवाई करावी, अशा सूचना महाराष्ट्राचे सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी मंठा येथे केले.

यावेळी दि.महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, स्थानिक संचालक छत्रपती संभाजीनगर, पांडुरंग घुगे, सरव्यवस्थापक मालमत्ता मुंबई नितीन यादव , जिल्हा पणन अधिकारी जालना राजेश हेमके, प्र. जिल्हा पणन अधिकारी छत्रपती संभाजीनगर विजय राठोड, खरेदी विक्री संघ अध्यक्ष भाऊसाहेब गोरे, उपाध्यक्ष सचिन बोराडे,



अजय अवचार, शरद पाटील, खुशाल ईघारे, प्रकाश घुले, गोविंद नवघरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. मागील महिन्यापासून मंठा शहरातील गाजलेल्या वादग्रस्त प्रकरणात जिल्हा पणन अधिकारी कार्यालय जालना यांच्या ताब्यातील मंठा येथील मार्केटिंग फेडरेशनचे गोदाम बेकायदेशीरपणे पाडण्यात आले असून, या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे. जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांच्या फिर्यादीवरून तक्रार देखील दाखल करण्यात आली होती. सदर गोदाम मार्केटिंग फेडरेशनची असताना मार्केटिंग फेडरेशनच्या ताब्यात असलेले मंठा येथील गोदाम व जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा सभापती व सचिव यांनी ना हरकत प्रमाणपत्र देऊन मार्केटिंग फेडरेशन कुठलीही कल्पना न देता अनाधिकृतपणे रात्रीच्या वेळेला सर्वे नंबर ४२ मधील गोदाम पाडल्या प्रकरणात बाजार समिती सभापती व सचिव तसेच दत्तात्रय किसनराव हातकडके व इतर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणामध्ये गोदाम पाडून शासकीय मालमत्तेचे नुकसान व यातील साहित्य व खत चोरीला गेल्यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून यात अनेक आरोपी आहेत. सर्व दोषींवर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीसाठी भाऊसाहेब गोरे यांनी आवाज उठवला. त्यांनी आवाज उठवल्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी मंठा येथे तात्काळ भेट देऊन गोदाम पाडल्या प्रकरणी, शासकीय मालमत्तेचे नुकसान करून साहित्य चोरी केल्याप्रकरणी व गोदाम पाडताना वापरलेले पोकलॅण्ड हायवा ट्रॅक्टर यासह ब्लास्टिंग ट्रॅक्टर या सर्व दोषींवर गुन्हे दाखल करावे, असे सांगितले.

## आठ महसूल सहाय्यकांना सहाय्यक महसूल अधिकारी पदावर पदोन्नती

जालना। प्रतिनिधी



जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत महसूल सहाय्यक आठ कर्मचाऱ्यांची सहाय्यक महसूल अधिकारी पदोन्नती देण्यात आली आहे. सह आयुक्त न.प.प्रशासन विभागातील गजानन महनूर यांची पदोन्नती झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी शिवाजी गवळी सहआयुक्त न.प. प्रशासन, दीपक इंगोले जिल्हा सह आयुक्त, सुशील भालेराव अभियंता, दत्तात्रय शिंदे, राहुल तांबे यांनी अभिनंदन केले. जालना जिल्हा महसूल आस्थापनेवरील महसूल सहायक संवर्गातून सहा. महसूल अधिकारी (अव्वल कारकून) संवर्गात पदोन्नती देण्यासाठी दि.०४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा पदोन्नती निवड समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये महसूल सहायक संवर्गातून सहायक महसूल अधिकारी (अव्वल कारकून) संवर्गात पदोन्नती देण्यासाठी खालील महसूल सहायक संवर्गातील कर्मचारी यांची पदोन्नती देण्यात आली आहे.

## बँक ग्राहक सेवा केंद्राला फसवणाऱ्या टोळीतील दोघे जेरबंद

संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील अनेक बँक ग्राहक सेवा केंद्र (सीएसपी सेंटर) चालकांना अडचणीची थाप मारून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील दोघांना ग्रामीण सायबर पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून कारसह ३ लाख ३७ हजारांचा ऐवज जप्त केला आहे. राहिल युनुस शेख (३७, रा. नाशीक), प्रवीण चंपालाल वैष्णव (४७, रा. सिन्नर, नाशिक) अशी अटकेतील दोघांची नावे आहेत.

ही टोळी बँक ग्राहक सेवा केंद्र चालकांना तातडीने रुग्णालयाचे बिल किंवा इतर पेमेंट भरायची थाप मारायचे. नातेवाईक तत्काळ तुमच्या खात्यावर ऑनलाईन पैसे पाठवणार असल्याचे सांगायचे त्यानुसार तेथील क्यूआर कोड किंवा फोन पे वर पैसेही पाठवायचे. त्याच दरम्यान सेवा केंद्रातील सदस्य तेथून ५० ते ८० हजार रुपये रोख घेऊन निघून जायचे. काही वेळातच सीएसपी चालकाला अनोळखी नंबरवरून फोन करून तुमच्या खात्यात चुकून पैसे जमा झाले आहेत असे सांगून सायबरमध्ये तक्रार नोंदवायची व ते पैसे न्यायालयीन प्रक्रियेद्वारे परत मिळवायचे. अशा प्रकारची फसवणूक श्रीरामपूर, संगमनेर, जालना, जळगाव, मुक्ताईनगर, नाशिक, जळगाव, बुलढाणा तसेच मध्यप्रदेश राज्यातही केली आहे. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रांजणगाव पोळ, गंगापूर, ढोरकीन आणि वेरूळ परिसरातील सीएसपी सेंटरवरही केली आहे. या प्रकरणी रांजणगाव पोळ (ता. गंगापूर) येथील राजू कचरु कुकलारे यांच्या तक्रारीवरून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून या टोळीतील दोघांना ताब्यात घेतले. या टोळीतील दोन सदस्य जळगाव जिल्ह्यात असल्याची माहिती मिळताच, सायबर पोलिसांनी मुक्ताईनगर परिसरातून वरील दोघांना पाठलाग करून राहिल शेख, प्रवीण वैष्णव या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कारसह सुमारे ३ लाख ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संजय देशमुख, विजयसिंग जोनवाल, निशा बनसोड, कैलाश कामठे, संतोष तांदळे, मुकेश वाघ, दत्ता तरटे, योगेश मोईम व इतर सहकाऱ्यांनी केली.

## श्रीमद भागवत कथेस उत्साहात प्रारंभ



परतूर । प्रतिनिधी

शहरातील हनुमान मंदिराच्या प्रांगणात श्रीमद भागवत कथेस बुधवारपासून उत्साहात प्रारंभ झाला आहे.

श्री परमपूज्य अंबेगड व परमपूज्य ब्राम्हवादीनी महाराज हिरादेवी यांच्या कृपेने श्री हभप गयाबाई महाराज जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या सोहळ्यात विठ्ठल महाराज कदम सिंगोना यांच्या ओजस्वी वाणीतून तसेच गायनाचार्य आबासाहेब महाराज भुतेकर व शेषरावनारायण महाराज इक्कर आणि आसाराम महाराज बागल यांच्या संगीताच्या साथीने भाविकांना कथा श्रवणाचा लाभ घेता येत आहे. १२ नोव्हेंबर रोजी भागवत कथेची सांगता होणार आहे.

याप्रसंगी आयोजित महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन गयाबाई महाराज जावळे यांच्यासह अंकुशराव बागल, वैजनाथराव बागल, कल्याणराव बागल, बाबा महाराज बागल यांनी केले आहे.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६७३/२०२५**

**ॲड. ठोसर ए. एस.**

अर्जदार १) सचिन पि. भागवत चव्हाण, वय-२३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. इमामपुर ता. जि. बीड., २) स्वप्नील पि. भागवत चव्हाण, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. इमामपुर ता. जि. बीड., (३) सखू भ्र. सखाराम चव्हाण, वय-७६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. इमामपुर ता. जि. बीड.

विरुध्द गैरअर्जदार : अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे भागवत पि. सखाराम चव्हाण यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे भागवत पि. सखाराम चव्हाण, रा. इमामपुर, ता. जि. बीड हे दिनांक १६/१०/२०२१ रोजी इमामपुर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र.३ ही मयताची आई आहे. मयताची पत्नी नामे रंजना भागवत चव्हाण हि दिनांक २०.०२.२०१७ रोजी मयत झालेली आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक १२/१२/२०२५

आज दिनांक १०/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

स्वाक्षरित
क.लि

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड



Daily Rajya Loktantra Date 28/08/2025

**PUBLIC NOTICE**


CHANGE IN NAME "I HAVE CHANGE MY NAME FROM TASLIM QURESHI TO QURESHI TASLIM BEGUM RAIS HENCE FOR THE DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE QURESHI TASLIM BEGUM RAIS IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY. "OLD NAME :- TASLIM QURESHI "NEW NAME :- QURESHI TASLIM BEGUM RAIS "ADD- BARABHAI GALI , AMBAJOGAI DIST BEED-431517


## कर्मचाऱ्यानेच पळविले पावणेतीन कोटींचे सोने, नळदुर्ग येथील घटना

धाराशीव। प्रतिनिधी

येथील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेतून शाखेतीलच कर्मचाऱ्याने कट रचून सुमारे दोन कोटी ६३ लाख ६३ हजार २७२ रुपयेचे तारण ठेवलेले सोने चोरुन नेल्याची घटना दि. ७ नोव्हेंबरच्या सायंकाळी सहा वाजले पासून ते दि. ८ नोव्हेंबरच्या रात्री दोन वाजाच्या दरम्यान घडली.

या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. दरम्यान घटनेची फिर्याद शाखाधिकारी उमेश भानुदास जाधव यांनी पोलिस ठाण्यात दिल्याने पतसंस्थेचे कर्मचारी राहुल राजेंद्र जाधव यासह इतर तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नळदुर्गच्या



इतिहासातील ही सर्वात मोठी चोरी असून यामुळे सर्वत्र खळबळ माजली आहे. या बाबत पोलिस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, दिशा नागरी सहकारी पतसंस्थेतील लिपीक पदावर काम करीत असलेला कर्मचारी राहल राजेंद्र जाधव याने संगनमत करुन त्याच्या पदाचा दुरुपयोग करुन त्याचा मित्र सुशील राठोड यासह इतर दोघे जण आपसात कट रचून दि. ७ नोव्हेंबर च्या सायंकाळी सहाच्या ते दि. ८ नोव्हेंबर च्या रात्री दोन वाजे पर्यंत शाखेच्या मुख्य शटरचे लॉक चावीने उघडून आत प्रवेश केला. आत मधील तिजोरीतील एकूण दोन त्रेसष्ठ कर्जदाराचे दोन कोटी ६१ लाख ४२ हजार सत्तावीस रुपयेचे कर्ज रक्कमेसाठी तारण ठेवलेले चार किलो ७६२ ग्रॅम ६७९ मिली वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम दोन लाख २३ हजार ७३७ रुपये पैकी दोन लाख २१ हजार २४५ रुपये असे एकूण दोन कोटी त्रेसष्ठ लाख त्रेसष्ठ हजार २७२ रुपयेचा मुददेमाल चोरुन नेला आहे. दरम्यान उमेश जाधव यांच्या फिर्यादीवरुन राहूल राजेंद्र जाधव, सुशील राठोड व इतर दोन अनोळखी असे चार जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस अधिक्षक रितू खोखर यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक इज्जपवार पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे जिल्हा पोलिस अधिक्षक रितू खोकर, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार, नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळंखे, आनंद कांगुने, पोलिस उपनिरीक्षक संतोष गिते, ईश्वर नांगरे यांनी घटना स्थळी भेट देवून पहाणी केली.


# परळी शहरात तिरंगी लढत ? बहीण भावाच्या निर्णयाकडे परळीकरांचे लक्ष

परळी । प्रकाश वर्मा

सर्व साधारण महिलेसाठी राखीव असलेल्या परळी नगर परिषदेच्या निवडणुका जाहीर होउन दोन दिवसाचा कालावधी उलटून गेला तरी परळी शहरातील उत्सुक उमेदवार अद्याप ही कामाला लागले नसुन आपआपल्या नेत्याच्या निर्णयाची वाट पाहत आहेत.

युती होणार असल्याची घोषणा माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी केली असून मात्र मंत्री पंकजाताई मुंडे यांनी अजित दादांशी बोलुन निर्णय घेणार असल्याचे दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमात सांगितले.

अशातच अनेक नवनवीन चेहरे अध्यक्ष पदाच्या शर्यतीत उतरले आहेत. कोणी जातीच्या आधारावर तर, मी खुप




काम केलय अशा अविर्भावात अनेक जण आपआपल्या नेत्याकडे तिकीट मागत आहेत ज्यांचे काम प्रभागा पुरतेच मर्यादित आहे असे अनेक जण नगराध्यक्षावर आपला हक्क सांगत आहेत.राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) गेल्या दोन निवडणुकीत सत्ताधारी पक्ष म्हणून परळीत वर्चस्व राखून आहे त्यामुळे इच्छुक ही मोठ्या प्रमाणावर आहेत यात माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,,मार्केट कमिटीचे संचालक जयपाल लाहोटी,नगरसेवक राजाभाई गुत्तेदार, सिराज गुत्तेदार, आदि तर भाजपकडून जुगलकिशोर लोहिया,शहराध्यक्ष सौ.उमाताई समशेट्टी, सौ.सुरेखाताई मेनकुदळे,आदि तर महाविकास आघाडी कडुन कॉंग्रेस आय चे बहादुरभाई व शरदचंद्र पवार पक्ष उमेदवार म्हणून दिपक देशमुख हे असणार आहेत इच्छुक उमेदवार आपआपल्या नेत्याकडे उमेदवारीसाठी प्रयत्न करत आहेत. यात विशेष म्हणजे प्रत्येक जण आपली पत्नी, आई,मुलगी ,बहीण यांच्यासाठी प्रयत्न करत आहेत. हे सगळेजण नुकतेच सामाजिक कार्यकर्ते झाले आहेत. यात त्यांनी आपले केलेले काम पणाला लावले असुन या सगळ्या संभावित उमेदवारांनी किती मोठे सामाजिक काम निर्माण केले असल्याचा भ्रम निर्माण करत आहे.

### भाजपा नगराध्यक्ष पदावर दावा सांगणार का ?

स्व.गोपीनाथराव मुंडे हयात असताना अनेक वेळा परळी नगर परिषदेत सत्ता स्थापन केली गेली व परळीला विकासाकडे नेण्याचा प्रयत्न केला ज्यात सुवर्ण जयंती नगरोतथान योजना असेल,पाणीपुरवठा योजना असेल. त्या नंतर पंकजाताई मुंडे यांनीही हाच प्रयत्न पुढे चालु ठेवला पण नंतर त्या सत्ता स्थापन करण्यात अपयशी ठरल्या. पण यावेळी परिस्थिती पुर्णताहा वेगळी असुन राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे जसे राज्यातील समीकरण बदलली तशी ती परळीत ही बदलली या बदललेल्या परिस्थितीत ज्यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात परळीतुन झाली अशा स्व. प्रमोद महाजन, स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या भुमीत पुन्हा एकदा भाजपाचा अध्यक्ष व्हावा यासाठी पंकजाताई मुंडे आपली ताकद लावणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### कणखर महिला नेतृत्व निर्माण करण्यात राजकीय नेते अपयशी

एकीकडे महिलांना ५०% आरक्षण निवडणुकीत दिले जाते परंतु निवडणुकीत मात्र प्रस्थापित नेत्यांच्या घरीच तिकिट दिले जाते यामुळे पाच वर्ष नेटाने काम करणार्या महिलांना मात्र नगरसेवक पदाच्या तिकिटासाठी मोठा संघर्ष करावा लागतो .याकडे राजकीय नेत्यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.काम करणार्या महिलांच्या पाठीमागे आपली राजकीय ताकद लावुन सर्व सामान्य महिला कार्यकर्त्याला अध्यक्ष पदांवर बसवण्याचा निर्णय परळीत माजी मंत्री आ.धनंजय मुंडे व ज्या स्वत महिला आहेत अशा मंत्री पंकजाताई मुंडे घेणार का ?याची उत्सुकता परळीकरांना निश्चितच आहे.

## नगर पालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवून शिवसेनेचा भगवा फडकवू –अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेना पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या शेकडो इच्छुक उमेदवारांचे मुलाखत सत्र काल सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यलय, बीड येथे पार पडले असून या मुलाखत सत्रादरम्यान जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे शिवसेना मध्यवर्ती कार्यलय हाऊसफूल



झाल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले होते. यामुळे काल सकाळी १०.०० वाजल्यापासूनच शेकडो इच्छुक उमेदवार आपल्या कार्य अहवालासह शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात उपस्थित होते. सर्व इच्छुक उमेदवारांची मुलाखत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली तर मुलाखतीदरम्यान बीड शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक देखील उपस्थित होते. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक ◀◀ पान ३ वर

## काळकुटेना धमकी देणाऱ्या इसमास तात्काळ अटक करून खाक्या दाखवा

### धनंजय मुंडे यांचा बीडच्या एसपीना फोन; मुंडेंच्या कार्यालयाकडून माहिती

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

गंगाधर काळकुटे यांना धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता असल्याचे सांगत धमकी दिल्याची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क करत काळकुटे यांना माझे नाव घेऊन धमकी देणाऱ्या बीड तालुक्यातील शेळके नामक कोणीतरी व्यक्तीस तात्काळ अटक करून त्याला चांगलाच खाक्या




दाखवावा, अशी सूचना केली असल्याची माहिती धनंजय मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाकडून कळवण्यात आली आहे.

सध्या एकूणच दूषित झालेल्या वातावरणाचा गैरफायदा घेऊन काही प्रवृत्ती जाणीवपूर्वक कोणत्याही विषयात धनंजय मुंडेंचे नाव ओढत आहेत. आज बीड तालुक्यातील शेळके नामक एका इसमाने काळकुटे यांना फोन करून तू परळीत ये, वगैरे आशयाच्या धमकी दिल्याच्या ऑडिओ क्लिप समाज माध्यमात व्हायरल झाल्याचा प्रकार समोर आला होता. त्याची दखल घेत धनंजय मुंडे यांनी तातडीने एसपी नवनीत यांना फोन करून सबंधित व्यक्तीस तातडीने ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करावी, तसेच या प्रकरणाचे सत्य माध्यमांच्या समोर आणावे; संबंधित व्यक्तीचा धनंजय मुंडे यांच्या शी संबंध नाही, असेही धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे. दरम्यान या प्रकरणी पोलीस काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून आपले करिअर घडवा–सुभेदार मेजर आशाराम

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी युनिटच्या वतीने आयोजित कार्यक्रमामध्ये ५१ महाराष्ट्र बटालियन छत्रपती संभाजीनगरचे सुभेदार मेजर आशाराम एस. बी. यांनी एनसीसीमध्ये निवड झालेल्या कॅडेट्सनी मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन केले तसेच एनसीसीच्या माध्यमातून आपले करिअर घडवावे असे सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमास बीएचएम एस. एस. राव यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या



अध्यक्षीय समारंभातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी एनसीसी कॅडेट्सला संबोधित करताना सांगितले की, आपणास देशसेवा व राष्ट्रभक्ती करण्याचे भाग्य मिळाले आहे. समाजामध्ये राष्ट्रीय भावना वृद्धिंगत होण्यासाठी सर्वांनी कार्य करावे असे सांगितले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ यांबरोबरच एनसीसी कॅडेट्स, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानले.

## रंभाबाई सानप यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

कै रंभाबाई सानप यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त ह भ प ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन

कै रमाबाई आसाराम सानप राहणार रायमोह तालुका शिरूर जिल्हा बीड यांचे प्रथम पुण्यस्मरण असून सानप कुटुंबातील रमाबाई आसाराम सानप यांना देवाज्ञा होऊन संपूर्ण एक वर्ष पूर्ण झाले असून सानप परिवाराच्यावतीने त्यांच्या समर्थ कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला असून संपूर्ण रायमोहा परिसरातील व गावातील नागरिकांनी वजनतेने या कीर्तनाचा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा प्रथम पुण्यस्मरण मंगळवार दिनांक ११/



११/२०२५रोजी असून त्याच्या पुण्यस्मरणानिमित्त विनोदाचार्य ह भ प ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान समस्त सानप परिवाराने केले आहे मंगळवार सकाळी १०/ते १२ वाजता किर्तन होणार असून भोजन दुपारी १२/ ते आपल्या आगमनापर्यंत राहील तरी सर्वांनी लाभ घ्यावा ही विनंती.

## महानुभव पंथासाठी स्मशानभूमीची जागा उपलब्ध समाजाने मानले आ.सुरेश धस यांचे आभार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील महानुभव पंथीयांच्या गेल्या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला अखेर यश आले असून आ.सुरेश धस यांनी यासाठी पुढाकार घेत महानुभव पंथाच्या अनुयायांसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची जागा उपलब्ध करून दिली आहे. या निर्णयामुळे पंथातील अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झाल्याने स्थानिक नागरिकांनी आणि पंथीय बांधवांनी आ.धस यांचे मनःपूर्वक आभार मानले यावेळी महानुभव गीता आश्रम आष्टी, संचालिका



तपस्विनी कांताबाई धाराशिवकर ,महानुभव आश्रम चिखली संचालक प. पु.प. म. उद्धव राज धाराशिवकर, श्री निशिकांत गरगडे, मुकुंद गरगडे,सुभाष गरगडे, भूषण गरगडे, चक्रधर गरगडे, अमोल गरगडे, निलेश गरगडे, स्वप्निल गरगडे, श्री कृष्णा गरगडे, श्री ज्ञानदेव सोनवणे, श्री प्रशांत तळेकर, श्री विशाल निराळे, श्री सुधीर अष्टेकर, श्री मधुकर मेहेरकर, श्री प्रवीण मेहेरकर, श्री राजाभाऊ भोज, श्री गंगाधर मल्ले, श्री विशाल सेठी, श्री निलेश सोनवणे, श्री पवन सोनवणे, व इतर साधुसंत आणि महानुभाव पंथीय समाज बांधवांनी आभार मानले.

## ग्रामीण भागातील खेळाडूंना सर्वतोपरी मदत करू -ॲड.सुरेश हात्ते

**तलवाडा । प्रतिनिधी**

**त्वरितापुरी महाविद्यालय तलवाडा याठिकाणी दिनाक १० नोव्हेंबर रोजी त्वरिता स्पोर्ट अकॅडमी च्या वतीने टिपीएल क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत नामफलकाचे अनावरण करून क्रिकेट सामन्याचे उद्घाटन केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अँड सुरेशराव हात्ते यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव आणि मोठ्या प्रमाणात खेळाडू तयार व्हावेत हा**



**उद्देश डोळ्यासमोर ठेवून येत्या काळात खेळाडूंना महाविद्यालय आणि आपण सर्वोतोपरी मदत करणार असे बोलतांना सांगितले.**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील त्वरितापुरी कला आणि विज्ञान महाविद्यालय चे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना आणि खेळाडूंना चालना मिळावी यासाठी त्वरिता स्पोर्ट अकॅडमी ची स्थापन केली असून यामार्फत विविध क्षेत्रातील खेळाडूंना प्राधान्य देण्यात येणार आहे.या अकॅडमी च्या वतीने १० नोव्हेंबर पासून त्वरिता प्रमीयल लीग क्रिकेट चे सामन्यांचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड सुरेशराव हात्ते,डॉ.राम धुमक,शिंगणे तात्या,माजी सरपंच राधाकिसन शिंगणे यांच्या हस्ते झाले यावेळी पत्रकार आल्ताफ कुरेशी,सुभाष शिंदे,विष्णु राठोड,,पत्रकार तुळशीराम वाघमारे, जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे,माजी ग्रामपंचायत सदस्य कचरू मरकड, ऋषी करडे,शेख अप्सर भाई,प्रल्हाद जाधव,शेख ◀◀ पान ३ वर

## वडवणीमध्ये धनंजय मुंडे समर्थकांचा व ओबीसी समाजाचा तीव्र आंदोलन,रास्तारोकोचा इशारा

### वडवणी शहरामध्ये माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक

वडवणी । प्रतिनिधी

सविस्तर वृत्त असे दि. ०७-११-२०२५ रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी एक जाहीर पत्रकार परिषद घेऊन स्वतःच्या सहकाऱ्यांना पुढे करत माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्यावर घातपाताचा कट रचल्याचे आरोप करत जाहीरपणे शिवीगाळ केली.

त्याचप्रमाणे मा. धनंजय मुंडे साहेब विरुद्ध खोटे पडयंत्र रचताना जाहीरपणे व माध्यमांच्या समोर



ऑन एअर धनंजय मुंडे साहेब यांचा नायनाट करू (हत्या करू) तसेच समस्त वंजारी समाजाचा नायनाट करू (हत्या करू) असे बोलून जाहीरपणे जिवे मारण्याची धमकी दिली आहे. मात्र अद्याप मनोज जरांगे या व्यक्तीविरोधात कोणतीही कारवाई पोलीस प्रशासनाने केली नाही. जाहीरपणे दिलेल्या या धमकी मुळे धनंजय मुंडे यांच्यावर राज्यात फिरत असताना सामूहिक हल्ले घडवून आणण्याचा कट मनोज जरांगे व त्याच्या साथीदारांनी रचला असून, त्यामाध्यमातून सातत्याने धनंजय मुंडे साहेब व वंजारी समाजाच्या विरोधात दहशत पसरविण्याचे काम जरांगे यांच्या मार्फत करण्यात ◀◀ पान ३ वर

## आ.धस यांच्या प्रयत्नामुळे पाटोद्यात होतेय श्री स्वामी समर्थांचे मंदिर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील स्वामी समर्थ भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली आहे.पाटोदा शहरातील क्रांतीनगर लाल हनुमान मंदिर परिसरात ५० बाय ४० फुट जागेत श्री स्वामी समर्थ मंदिराचे काम वेगाने सुरू आहे. दोन महिन्यांत स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे.हे काम देशमुख कुटुंबीयांनी दिलेल्या जागेत सुरू झाले. आमदार सुरेश धस आणि सौ.प्राजक्ताताई धस यांच्या पाठपुराव्यांमुळे २५ लाखांचा निधी मंजूर झाला.काही दिवसांपूर्वी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली.शनिवारी दिनांक ८/११/२०२५ रोजी कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी मंदिराच्या कामाची पाहणी केली. त्यांनी कामाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले व निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल आमदार सुरेश धस यांचे आभार मानले.यावेळी त्यांनी आमदार धस यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला.धस यांनी मंदिरासाठी आणखी २५ लाखांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.




स्वामी समर्थ केंद्र यापूर्वी संत नरहरी महाराज मंदिरात तात्पुरते चालवले जात होते.सेवेकऱ्यांनी मंदिरासाठी स्वतंत्र जागेची मागणी केली होती.त्यानंतर आमदार सुरेश धस यांच्या कडे मागणी केल्यानंतर त्यांनी शासनस्तरावर प्रयत्न करुन २५ लक्ष रुपये निधी मंजूर करून दिला.मंदिरासाठी स्वर्गीय प्रभाकर बंडू देशमुख आणि त्यांच्या कुटुंबीयांनी ५० फुट बाय ४० फुटची जागा मंदिराला दान दिली.त्यानंतर कामास सुरुवात झाली.श्री स्वामी समर्थ गुरु पीठाचे प्रमुख आण्णासाहेब मोरे माऊली यांचे चिरंजीव कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी शनिवारी अचानक पाटोदा शहरात भेट दिली आणि सेवेकऱ्यांच्या विनंतीवरून आबासाहेब मोरे यांनी मंदिराच्या कामाची पाहणी केली.मंदिराच्या दुसऱ्या मजल्यासाठी आणखी २५ लाखांचा निधी लवकरच उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.या कामासाठी २०१९ पासून सेवेकऱ्यांसह आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी पाठपुरावा केला होता. आता हे मंदिर पूर्णत्वाकडे जात असुन या मंदिराचे अगदी दर्जेदार काम गुत्तेदार तुकाराम येवले हे करत आहेत.येथे भव्य सभागृह,गर्भगृह आणि सर्व सोयीसुविधांसह आध्यात्मिक केंद्र उभारले जात आहे.हे केंद्र पाटोदेकरांसाठी मोठे अध्यात्मिक स्थान ठरणार असल्याचा विश्वास कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी व्यक्त केला.या वेळी नगराध्यक्ष राजु भैय्या सौ.आशाताई कोल्हे,संतोष दिक्षित, पंडित सह महीला भगिनी मोठ्या संख्येने भक्तांची उपस्थिती होती.

## बीड न्यायालय परिसरात बेशिस्त वाहनधारकांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

माननीय जिल्हा व प्रमुख न्यायाधीश यावलकर यांच्या आदेशानुसार आज कोर्ट परिसरातील बेशिस्त वाहनधारकांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली. माननीय कोर्ट परिसरात अव्यवस्थितपणे पार्किंग करणाऱ्या जवळपास शंभर ते सव्वाशे वाहनांवर वाहतूक शाखेकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली. ◀◀ पान ३ वर

### शंभराहून अधिक वाहनांना दंड ठोठावला!



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटीलवर 'त्या' प्रकरणात गैरसमजुतीने गुन्हे, पुणे पोलिसांचा अजब कारभार!



**पुणे । प्रतिनिधी**

पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी पुण्यातील मुंढवा येथील ४० एकर जमीन अनियमितपणे खरेदी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे याप्रकरणी उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली असून महिनाभरात या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात येणार आहे. तत्पूर्वी आता पुणे पोलिसांनी जमीन घोटाळ्याप्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपी शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांना बोपोडी जमीन घोटाळ्यात क्लिन चीट दिली आहे. गैरसमजुतीतून बोपोडी प्रकरणात त्यांची नावे गुन्ह्यात नोंद करण्यात आल्याचं पोलिसांनी (झेश्रळलश) म्हटलं आहे. त्यामुळे, पोलिसांचा अजब कारभारही चव्हाट्यावर आला आहे. पुण्यातील बोपोडीतील जमीन घोटाळा प्रकरणात शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांचा संबंध नसल्याच पुणे पोलीसांनी जाहीर केलं आहे. गैरसमजुतीतून त्यांची नावे गुन्ह्यात नोंद करण्यात आल्याचं पुणे पोलिसांनी म्हटलय. त्यामुळे, या जमीन घोटाळ्यातील नेमकं आरोपी किंवा चुका करणार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. दरम्यान, पुणे पोलिसांकडून जरी शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांना क्लिन चीट देण्यात आली आहे. मात्र मुंढवा इथल्या जमीन घोटाळ्यात शीतल तेजवानी आणि दिग्वीजय पाटील यांची चौकशी करण्यात येईल, असेही पोलिसांनी म्हटलं. आतापर्यंत या जमीन घोटाळ्यतील आरोपींना अटक का करण्यात आलेली नाही या प्रश्नावर पुणे पोलीसांनी कागदपत्रे तपासासाठी मागवली आहेत एवढंच उत्तर दिलय.

पुण्यातील मुंढवा इथल्या जमीन व्यवहाराबद्दल आधी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या बावधन पोलीस ठाण्यात दिग्वीजय पाटील, शीतल मेजवानी आणि रविंद्र तारु यांच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी पुणे पोलिसांनी देखील यात उडी घेत नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. पुणे पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा बोपोडी आणि मुंढवा या दोन जमीन घोटाळ्यांची संबंधित असल्याचं पुणे पोलिसांचं म्हणणं होतं. मात्र, आता या यातील फक्त मुंढव्याच्या प्रकरणात शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांची चौकशी होईल, असं पुणे पोलिसांनी सांगितलं आहे. पुणे पोलीस आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक मासाळ यांनी याबाबत माहिती दिली. त्यामुळे, गुन्हा दाखल करणारे पोलीसच आता गैरसमजुतीचं कारण पुढे करत असल्याने पोलिसांच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## खड्ड्यांमुळे मृत्यू किंवा जखमी झालेल्याने विधी सेवा प्राधिकरणात भरपाईचा दावा दाखल करता येणार

पुणे – खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातात मृत्यू किंवा जखमी झालेल्या वाहनचालकांना आता विधी सेवा प्राधिकरणात भरपाईचा दावा दाखल करता येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश डी. पाटील यांच्या खंडपीठाने खड्ड्यांमुळे होणारे मृत्यू आणि रस्ते सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यात नागरिकांच्या जीवन आणि सुरक्षिततेच्या अधिकाराचे रक्षण करणाऱ्या ऐतिहासिक निकालामध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे. उच्च न्यायालयात एका याचिकेवर निकाल देताना भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत रस्ते सुरक्षित व स्थितीत ठेवणे ही नागरी आणि रस्ते निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे संविधानिक कर्तव्य आहे.



राज्यातील खड्डे, उघडे मॅनहोल आणि असुरक्षित रस्त्यांच्या परिस्थितीमुळे होणारे मृत्यू आणि दुखापतीसाठी जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयाने व्यापक निर्देश दिले आहेत. खड्ड्यांमुळे नागरिकांचे मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसांना सहा लाख रुपये भरपाई देण्यात यावी. जखमी झाल्यास दुखापतीच्या तीव्रतेनुसार ५० हजार ते २ लाख ५० हजार रुपयांदरम्यान भरपाई द्यावी. दावा केल्यापासून सहा ते आठ आठवड्यांच्या आत भरपाई देण्यात यावी, असे निकालात नमूद केले आहे.

शहरी भागात महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद, महामार्ग आणि आंतरजिल्हा रस्त्यांबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांबाबत जिल्हा परिषद आणि ग्रामीण विकास विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे. सदोष रस्त्यांच्या कामासाठी जबाबदार असलेले अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांना पुढील गोष्टींना सामोरे जावे लागेल. यामध्ये विभागीय कारवाई आणि पीडितांना दिलेली भरपाई वसूल करणे आणि निष्काळजीपणामुळे मृत्यू किंवा गंभीर दुखापत झाल्यास फौजदारी खटला चालविणे, वेळेत भरपाई देण्यास किंवा कृती करण्यास अयशस्वी झाल्यास महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा विभाग प्रमुख वैयक्तिकरित्या जबाबदार असतील.

## वडगाव शेरी युवकाचा डंपरखाली मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

डंपरचालकाने जोरात हॉर्न वाजविला. त्यामुळे समोरील दुचाकीस्वार दुचाकी स्लीप झाल्याने खाली पडला. पाठीमागील डंपर अंगावरून गेल्याने एकाचा मृत्यू झाला. सचिन वसंत धुमाळ (वय. २८,रा. मल्हारनगर वडगाव शेरी) असे मृत तरुणाचे नाव आहे. (डरींर्शीं झींपश छ्शुी)

याप्रकरणी, सचिन याचा मित्र स्वप्निल भानुदास माने (वय. २५,रा. सोमनाथनगर, मूळ. परभणी) याने विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी डंपरचालकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना रात्री बारा वाजताच्या सुमारास टाटा गार्ड रूम बस स्टॉप जवळ विमाननगर परिसरात घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी माने आणि मृत सचिन हे दोघे दुचाकीवरून निघाले होते. या वेळी सचिन दुचाकी चालवित होता. पाठीमागून आलेल्या डंपरचालकाने जोरात हॉर्न वाजविला. त्यामुळे दुचाकी स्लीप झाल्याने दोघे खाली पडले. त्यावेळी डंपर अंगावरून गेल्याने सचिन याचा मृत्यू झाला. अपघातानंतर डंपरचालक घटनास्थळी न थांबता फरार झाला असून, त्याचा शोध सुरू असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक समीर करपे यांनी दिली.

## वाळूखाली दबून ५ वर्षांच्या बालकाचा दुर्देवी मृत्यू; डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

**डंपरमधून वाळू उतरवित असताना वाळूखाली दबून पाच वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात घडली. दुर्घटनेत बालकाची आई, तसेच त्याचा भाऊ, चुलत बहीण वाळूखाली दबले गेले. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. उपचारानंतर त्यांना सोडून देण्यात आले. अलोक अशोक कचरे (वय ५) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. या दुर्घटनेत त्याची आई आरती (वय ३५) भाऊ श्लोक (वय ६), चुलत बहीण प्रियंका (वय १५) हे जखमी झाले. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी डंपर चालकाविरुद्ध राजगड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कचरे कुटुंबीय नसरापूर परिसरातील धनगर वस्ती येथे राहायला आहेत. कचरे कुटुंबीयांचे जुने घर आहे. हे घर पाडण्यात आले असून, नवीन घर बांधण्याचे काम सुरू आहे. नवीन घराचा पाया खोदून तेथे खांबही उभे करण्यात आले आहे. जवळच एका पत्र्याच्या शेडमध्ये कचरे कुटुंबीय राहायला आहे. शनिवारी (८ नोव्हेंबर) बांधकाम साहित्य पुरवठदाराकडून अशोक कचरे यांनी वाळू मागविली होती. दुपारी दीडच्या सुमारास धनगर वस्ती परिसरात वाळू घेऊन डंपर चालक तेथे आला. बांधकामाच्या ठिकाणी डंपरमधून वाळू उतरविण्याचे काम करण्यात येत होते. त्यावेळी डंपरचालकाने कचरे कुटुंबीय राहत असलेल्या पत्र्याच्या शेडजवळ वाळू उतरविण्याच्या प्रयत्न केला. मात्र, डंपर चालकाच्या चुकीमुळे वाळू पत्र्याच्या शेडवर पडली. त्यावेळी शेडमध्ये अलोक, त्याची आई आरती, भाऊ श्लोक, प्रियंका होते. अचानक वाळूचा शेडवर पडल्याने पत्रा फाटला. वाळूच्या ढिगाऱ्याखाली अलोक, त्याची आई आरती, भाऊ श्लोक, चुलत बहीण प्रियंका दबले गेले. रहिवाशांनी हा प्रकार पाहिल्यानंतर त्यांनी तेथे धाव घेतली. वाळूच्या ढिगाऱ्याखाली सापडलेल्या चौघांना नसरापूरमधील खासगी रुग्णालयात दाखल केले.

वाळूच्या ढिगाऱ्याखाली सापडल्याने त्यांच्या नाका तोंडात वाळू गेली होती. बेशुद्धावस्थेतील अलोक याचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्याची आई, भाऊ, चुलत बहिणीव खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले, दुर्घटनेस जबाबदार ठरल्याप्रकरणी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती राजगड पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक औदुंबर अडवळ यांनी दिली.

## पुणे गुन्हे शाखेकडून ईडीला पत्र; घायवळच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची विनंती

पुणे : पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून संगठित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख निलेश घायवळ याच्या आर्थिक व्यवहारांचा तपास अंमलबजावणी संचालनालयाला (ED) करण्याची शिफारस करण्यात आली आहे. घायवळविरुद्ध विविध गंभीर गुन्ह्यांची नोंद असून, त्याने गुन्हेगारीतून मोठी संपत्ती कमावल्याचा संशय आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, निलेश घायवळ आणि त्याच्या टोळीविरुद्ध एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांमध्ये खंडणी, गुन्हेगारी कट, फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, खूनाचा प्रयत्न आणि मालमत्ता बळकावण्यासाठी दुखापत करणे अशा गंभीर कलमांचा समावेश आहे. तपासादरम्यान पोलिसांना घायवळच्या मोठ्या आर्थिक उलाढालीचे पुरावे मिळाले आहेत. त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी धाराशिव, अहमदनगर, बीड, सातारा आणि परिसरात विंड पॉवर प्रकल्पांशी संबंधित गैरव्यवहार, खंडणी आणि बेकायदेशीर व्यवहारांद्वारे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जमविल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भातील एफआयआर आणि पुरावे ईडीकडे पाठविण्यात आले असून, तपासादरम्यान मनी लॉन्ड्रिंगचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, घायवळने बेकायदेशीर मार्गाने पासपोर्ट मिळवला असल्याचेही समोर आले असून, तो सध्या परदेशात फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी 'एनडीए' चे नवे कमांडंट

**पुणे । प्रतिनिधी**

व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे (एनडीए) नवे कमांडंट म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी व्हाइस ॲडमिरल गुरचरण सिंग यांच्याकडून ही जबाबदारी स्वीकारली.

व्हाइस ॲडमिरल जग्गी हे भारतीय नौदल अकादमीचे माजी विद्यार्थी असून, १ जानेवारी १९९३ रोजी त्यांची भारतीय नौदलात नियुक्ती झाली. नेव्हिगेशन आणि डायरेक्शन तज्ञ असलेले व्हाइस ॲडमिरल जग्गी यांनी तीन दशकांहून अधिक काळ विविध ऑपरेशनल, स्टाफ, डिप्लोमॅटिक आणि इंस्ट्रक्शनल जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी क्षेपणास्त्र जहाज आयएनएस वीर आणि स्वदेशी शिवालिक श्रेणीतील स्टेल्थ गाईडेड मिसाइल फ्रिगेट आयएनएस सह्याद्रीचे नेतृत्व केले आहे.

व्हाइस ॲडमिरल जग्गी यांनी वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज आणि गोवा येथील नेव्हल वॉर कॉलेजमधून पदवीचे शिक्षण



पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, त्यांनी लंडन येथील भारतीय उच्चायुक्तालयात नौदल सल्लागार म्हणून देखील काम केले आहे. यासोबतच, नवी दिल्ली येथील एनएचक्यूमध्ये कमोडोर (परदेशी सहकार्य) म्हणून काम करताना त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधांचा अनुभव मिळाला आहे. एनडीएचे कमांडंट म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी, व्हाइस ॲडमिरल जग्गी यांनी महाराष्ट्र नौदल क्षेत्राचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग म्हणून जबाबदारी सांभाळली. महाराष्ट्र राज्य आणि स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून नागरी-लष्करी संपर्क उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

## टाळ-मृदंगाचा गजर; पांडुरंग पालखी सोहळ्याने वाल्हे भक्तिरसात न्हाले

**वाल्हे । प्रतिनिधी**

धन्य धन्य ज्ञानेश्वरा अलंकापुरी समाधी स्थिरा !! कृष्ण पक्षी तुझ निर्धारा.मी भेटी देत जाईल!! ही भावना मनी ठेऊन कपाळी बुक्का, गंध लावून, खांद्यावर भगव्या पताका उंचावत लाखो वैष्णवांनी टाळ-मृदंगाच्या गजरात आज आद्यरामायणकार महर्षि वाल्मिकी ऋषींच्या वाल्हेनगरीत, ज्ञानबा-तुकाराम चा जयघोष करीत, श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यासाठी पंढरपूरहून आळंदीकडे मार्गस्थ झालेल्या श्री पांडूरंग पालखी सोहळा व संत नामदेव महाराज पालखी सोहळा रविवार (दि.९) वाल्हे (ता. पुरंदर) येथे विसावला.



विठ्ठल महाराज वासकर, व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर यांच्या वतीने हा पालखी सोहळा मागील अकरा वर्षांपासून सुरू करण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातून पुणे जिल्ह्यामध्ये प्रवेश केल्यानंतर निरा नदीवरील दत्तघाटावर पांडुरंगाच्या पादुकांना पवित्र स्नान घालून, दुपारची विश्रांती घेऊन, पालखी सोहळा महर्षि वाल्मिकींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वाल्हे येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळावरती सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान विसावला.

यावेळी, सोहळा प्रमुख विठ्ठल (दादा) तात्यासाहेब वासकर, ऋषी महाराज वासकर, चैतन्य महाराज वासकर, विठ्ठल - रुक्मिणी पालखी सोहळा व्यवस्थापक कुलदीप कुलकर्णी, अनिरुद्ध कुलकर्णी आदींसह वैष्णव उपस्थित होते. दरम्यान, पांडुरंग महाराज पालखी सोहळयाचे स्वागत वाल्हेकर ग्रामस्थांच्या वतीने, सरपंच अतुल गायकवाड यांनी केले. यावेळी, माजी सरपंच दत्तात्रेय पवार आदींसह ग्रामस्थांनी स्वागत केले.यावेळी, टाळ मृदुंगाचा गजर ज्ञानदेव तुकारामांच्या जयजयकाराने संपूर्ण पालखीतळ भक्तिमय झाला होता. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये समाज आरती झाली.यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येत समाज आरतीस उपस्थित होते.

सासवडला आज मार्गस्थ होणार..

सोमवार (दि.१०) पहाटे ३ वाजता पालखी सोहळा सासवड मुक्कामी मार्गस्थ होणार असल्याची माहिती पालखी सोहळा संपर्क प्रमुख मेघराज वाळके -पाटील यांनी दिली. दरम्यान, पालखी सोहळ्याकरिता पंढरपूरपासून आळंदीपर्यंत संत ज्ञानेश्वर महाराज ट्रस्ट व पुण्याचे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांच्याकडून पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिला असल्याची माहिती सोहळा मालक नामदास महाराज यांनी दिली.

# पिंपरी चिंचवड महापालिकेची आरक्षण सोडतीसाठी सर्व तयारी पूर्ण

**प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली**

पार पडणार कार्यक्रम

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर सोडत त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूक विभागाची तयारी पूर्ण झाली आहे.



महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडतीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज प्राधिकृत अधिकारी डॉ. पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली रंगीत तालीम देखील पार पडली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे, स्मार्ट सिटीचे सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पोलीस निरीक्षक अंकुश बांगर तसेच निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेले महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार यांनी आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाने केलेल्या तयारीची संपूर्ण माहिती घेतली. तसेच आरक्षण सोडतीच्या दिवशी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. यावेळी पोलीस प्रशासन व महापालिकेच्या सुरक्षा विभागाच्या वतीने ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.

**शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी**

११ नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबर रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह परिसरात शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी असणार आहे. तरी आरक्षण सोडतीच्या ठिकाणी खासगी वाहने आणू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**चार टप्प्यात पार पडणार आरक्षण सोडत**

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभागांमध्ये राखीव जागा वाटप करून नियम २०२५ नुसार प्रथम अनुसूचित जाती महिला आरक्षण सोडत काढणे. २) अनुसूचित जमाती महिला आरक्षण सोडत काढणे. ३) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढणे व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांकरीता वाटप करणे. नियमानुसार कारवाई करणे.४) सर्व साधारण महिलांकरीता जागा नेमून देणे.

## पुस्तकांवरील जीएसटी कमी करा; मुरलीधर मोहोळांचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना निवेदन

**पुणे । प्रतिनिधी**

पुस्तक व कागदावर लागू असलेला वस्तू आणि सेवा कर (ऋडढ) दर कमी करण्याची मागणी प्रकाशन आणि शैक्षणिक क्षेत्राकडून जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याचे खासदार तथा केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना याबाबत औपचारिक पत्र पाठविण्यात आले आहे.



मोहोळ म्हणाले, कागद आणि संबंधित साहित्यावरील जीएसटी दर १२ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत वाढल्यामुळे पुस्तकांच्या किंमतींमध्ये १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. या वाढीचा परिणाम थेट विद्यार्थी, पालक, लेखक, तसेच लघु आणि मध्यम प्रकाशन उद्योगांवर होत आहे. कोविडनंतर अजूनही सावरण्याच्या टप्प्यात असलेला प्रकाशन व्यवसाय या वाढलेल्या करामुळे पुन्हा संकटात सापडू शकतो, त्यामुळे जीएसटी वाढीचा पुनर्विचार करावा अशी विनंती करत आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, पुस्तके ही केवळ वस्तू नसून ती ज्ञान, शिक्षण आणि संस्कृतीचा पाया आहेत. अशा परिस्थितीत पुस्तकांवरील जीएसटी दर कमी करून पुन्हा १२ टक्क्यांवर आणावेत किंवा शैक्षणिक वापरासाठी असलेल्या कागद व पुस्तकांना करातून पूर्णतः सूट द्यावी.

जीएसटी दर कमी केल्यास प्रकाशन व मुद्रण उद्योगाला पुनरुज्जीवन मिळेल, पुस्तके व शैक्षणिक साहित्य सर्वांसाठी परवडणारे राहतील आणि विकसित भारत या ज्ञानाधिष्ठित ध्येयाला चालना मिळेल, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच शिक्षण आणि प्रकाशन क्षेत्र ही ज्ञानाधारित समाजाची दोन महत्त्वाची स्तंभ आहेत. या क्षेत्रावर वाढत्या कराचा बोजा नको, अशी विनंती मोहोळ यांनी पत्रात केली आहे.